# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक 10.08.2012 (का.प.क्र.09) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**शुक्रवार दिनांक 10.08.2012 (का.प.क्र.09) रोजी मा.सभापती श्री.विकास रतनलाल जैन यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे सकाळी 11.30 वाजता वंदेमातरम् या गिताने सुरू झाली सभेला मा.प्र.आयुक्त, श्री.अजय चारठाणकर, प्र.नगर सचिव श्री.रविंद्र निकम यांचेसह संबधीत अधिकारी तसेच खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.**

**01. स. श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल**
**02. स. श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत**
**03. स. श्री.मुंडे बाळासाहेब दिनकर**
**04. स. श्रीमती राजपुत प्राजक्ता विश्वनाथ**
**05. स. श्रीमती घडमोडे सविता भगवान**
**06. स. श्री.कुचे नारायण तिलोकचंद**
**07. स. श्री. खान अक्रम करीम खान**
**08. स. श्री.जाधव विजेंद्र मुरलीधर**
**09. स. श्री.मो.मुजीबोद्दीन कदीरोद्दीन**
**10. स. श्रीमती निलाबाई देविदास जगताप**
**11. स. श्री.समीर सुभाष राजुरकर**

**चर्चा :**

**मा.सभापती** **:मा.आयुक्तांनी पत्र दिले आहे की, कामात व्यस्त असल्याकारणाने बैठकीस येवु शकत नाही. 43 (2) नियमात तरतुद असुन आयुक्त त्यांचे प्रतिनिधीला बैठकीत बसवु शकतात प्रतिनिधी ज्या सूचना देत आहे ते आयुक्त सूचना व माहिती देत आहे असे समजण्यात येईल.**

**श्री.समीर राजुरकर** **:मागील बैठकीत सुनावणी घेण्यात आली होती. अपिल करावयाची आणि त्यावरील शास्ती लादणे 56 आणि पोट कलम 4 वाचुन दाखविण्यात यावे. ज्या कोणत्याही नगरपालिका अधिकाऱ्यास किंवा कर्मचाऱ्यास महानगरपालिके व्यतिरिक्त अन्य कोणत्याही प्राधिकाऱ्याकडून खालच्या पदावर आणण्यात आले असेल, काढून टाकण्यात आले असेल किंवा बडतर्फ करण्यात आले असेल त्यास, खालच्या पदावर आणण्याचा, काढून टाकण्याचा किंवा बडतर्फ करण्याचा आदेश त्यास कळवल्यापासून एक महिन्याच्या आत, ज्या प्राधिकाऱ्याने शास्ती लादली असेल त्याच्या निकट वरिष्ठ प्राधिकाऱ्याकडे अपील करता येईल आणि अपील प्राधिकाऱ्यास, ज्या प्राधिकाऱ्याने शास्ती लादली असेल त्याच्याकडून अभिप्राय मिळवल्यानंतर दिलेला आदेश कायम करता येईल किंवा अशा आदेशाऐवजी त्यास न्याय्य वाटेल असा आदेश देता येईल. यात एखादी कमी शास्ती लादण्याचा आदेशाचा समावेश होतो आणि अपील प्राधिकाऱ्याने दिलेला आदेश ताबडतोब अंमलात येईल व तो निर्णायक असेल.**

अपिल प्राधिकाऱ्याने दिलेला आदेश हा शेवटचा निर्णायक असेल का? म्हणजे त्या प्राधिकाऱ्यापुरता तो अंतिम असेल. हे मिनिटस् मध्ये आले पाहिजे. त्यानंतर मा.सभापती यांनी आदेश द्यावे.

नगर सचिव यांना सातत्याने दोन स्मरणपत्र देण्यात आलेले आहे. 10 बैठका झालेल्या आहेत. एकाही बैठकीचे इतिवृत्त प्राप्त झालेले नाही. मागच्या बैठकीत आम्ही काय बोललो? काय ऑर्डर दिल्यात हे 8-9-9 मिटींगमध्ये कळणार नसेल तर कस चालणार?

**श्री.रेणुकादास वैद्य** :स.सदस्य श्री.समीर राजुरकर यांनी महत्वाचा मुद्दा उपस्थित केलेला आहे. अतिशय रास्त आहे. कमीत कमीत आवश्यक स्टाफ नगर सचिव विभागाकडे नाही. नगर सचिव विभागातील सदगृहस्थ कर्मचारी हे स्थायी समिती सभेचे मागील पाच वर्षापासून श्री.मारवाडे इतिवृत्त नोंद करण्याचे/स्टेनोचे काम करीत आहे. एका रूपयाचा मोबदला त्यांना दिलेला नाही. कनिष्ठ लिपीक म्हणुन काम करतात त्यांना स्टेनोचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आलेला आहे. गेल्या पाच वर्षापासुन ते नियमित काम करीत आहे. या सर्व बारीक सारीक गोष्टी नगरसेवकांनी बघायच्या प्रशासन काय करते? नगर सचिव विभागात कर्मचारी कमी आहे त्या ठिकाणी कर्मचाऱ्यांची/स्टेनोची अत्यंत आवश्यकता आहे. इतिवृत्ताची कॉपी स.सदस्यांच्या हाती पोहचत नाही. याची जबाबदारी कुणी घेतली पाहिजे. या सर्व गोष्टी प्रशासनानीच बघायच्या असतील तर सर्व नगरसेवकांनी राजीनामा देवुन घरीच बसले पाहिजे. सर्वच जबाबदाऱ्या नगरसेवकांनी बघायच्या कुठल्या विभागात कर्मचारी नाहीत कर्मचाऱ्याला वेतन मिळते की, नाही का?फक्त मानधन मिळते या सर्व बाबी सदस्यानी बघायच्या का? या गोष्टी अतिशय गंभिरपणे घ्यायला पाहिजेत. मा.आयुक्त कामात व्यस्त आहे. अप्पर आयुक्त हे पद मनपामध्ये मंजूर झालेले आहेत. आजच्या आज शासनास पत्र पाठविण्यात यावे की, मा.आयुक्तांवर प्रचंड कामाचा बोजा आहे. शहर मोठे आहे. वाढते आहे. त्यांना स्थायी समिती बैठकीला हजर राहणे शक्य होत नाही. सबब आमच्याकडे पद मंजूर झाले असुन अधिकारी पाठविण्यात यावे. अशा पध्दतीचे पत्र देण्यात यावे. स्थायी समितीमध्ये शहराचे, आर्थिक महत्वाचे निर्णय होतात. आयुक्तांचे प्रतिनिधी हे सूचना बघतील. परंतु नगर सचिव विभागात स्टेनो/कर्मचारी नाही. हे बघायच काम प्रशासनाचे आहे. नगर सचिव विभाग कसे अपडेट करायचा हा प्रशासनाचा भाग आहे. नेमक याबाबतीत काय करायच याचा खुलासा करण्यात यावा.

**मा.सभापती** :खुलासा करण्यात यावा. नगर सचिव विभागात कर्मचारी पुरेसे आहेत का? ते योग्य आहेत का?

**श्री.बाळासाहेब मुंडे** :मॅनपॉवरची समस्या प्रत्येक विभागात आहे.

**नगर सचिव** :नगर सचिव विभागात 5 कर्मचारी कार्यरत आहेत. 1 स्टेनो असुन 4 लिपीक वर्गीय कर्मचारी आहेत. पुर्वी नगर सचिव विभागात 1 कार्यालयीन अधिक्षक व 2 वरिष्ठ लिपीक कार्यरत होती. ते पदे सध्या अस्तित्वात नाहीत. तसेच नगर सचिव विभागामध्ये कार्यक्रम पत्रिका तयार करण्याचे काम नियमित होत असते.

**श्री.समीर राजुरकर** :कर्मचारी केव्हापासून गेलेत.

**नगर सचिव** :कार्यकाळ सांगता येणार नाही. चौकशी केली असता माहिती मिळाली आहे. जे स्टेनो सभांची मिनीटस् घेतात तेच ड्रॉन करू शकतात. दुसरा कर्मचारी ते काम करू शकत नाही. कामाचा व्याप वाढलेला आहे.

**श्री.समीर राजुरकर** :त्या कर्मचाऱ्यांनी इतिवृत्त ड्रॉन केलेले नाही. असे म्हणने आहे का? 8 स्थायी समितीचे सभा झालेले आहे.

**नगर सचिव** :सर्वसाधारण सभेचे जानेवारी 2012 पासूनचे इतिवृत्त दिलेले नाहीत.

**श्री.समीर राजुरकर** :8 इतिवृत्त देणार आहे किंवा नाही. मला आता सभागृहात बसण्याची इच्छा राहीलेली नाही. इतिवृत्त देण्याची जबाबदारी प्रशासनाची आहे.

**नगर सचिव** :या संदर्भाने प्रशासनाला मा.महापौरांना, मा.सभापती, प्रशासनाला कर्मचारी वर्ग कमी असल्यामुळे इतिवृत्त करता येत नाही हे कळविण्यांत आलेले आहे.

**श्री.समीर राजुरकर** :माझा पत्रव्यवहाराशी काहीही संबध नाही. कायद्यानुसार किती दिवसात इतिवृत्त देणे बंधनकारक आहे. हे सांगण्यात यावे. या ठिकाणी फक्त आम्ही बसण्यासाठी आलेलो नाही. किती दिवसात इतिवृत्त देणार आहेत.

**मा.सभापती** :याबाबत माहिती प्रशासनाला कळविण्यांत आलेली आहे? आस्थापना विभागास पत्र देण्यात आलेले आहे? नगर सचिव विभागास हि पदे पाहिजे म्हणुन.

**नगर सचिव** :नगर सचिव विभागास कर्मचारी कमी असल्याबाबत आस्थापना विभाग, मा.महापौर, मा.सभापती यांना कळविण्यांत आलेले आहे.

**श्री.समीर राजुरकर** :पुर्वी इतिवृत्त मिळत होते. आज तोच स्टाफ आहे. कायद्याप्रमाणे इतिवृत्त देण्यात यावे जेणे करून इतिवृत्तामध्ये काय बदल करायचा ते सांगण्यात येईल.

**मा.सभापती** :सभागृह हे इतिवृत्ताशिवाय चालु शकतो काय? ॲक्शन पॉईटवर सभेचे कामकाज चालविण्यात येते.

**श्री.समीर राजुरकर** :आमच्या हक्काची गोष्ट आम्हाला मिळु द्या. आमच्या मुलभूत हक्कामधील एक भाग आहे. ते मिळु द्या. आपणच नगर सचिव विभागात जाऊन इतिवृत्त तयार करू.

**मा.सभापती** :सर्व विभागाचे सदस्यांनी बघायचे का? नगर सचिव विभागात आवश्यक कर्मचारी देण्याबाबत प्रशासनाने बघायचे.

**श्री.समीर राजुरकर** :एखादे इतिवृत्ताबाबत समजु शकतो? कामाचा बडगा आहे. कामाचा व्याप आहे. हे मान्य आहे. सभागृहात येऊन काही उपयोग नाही. वेळ वाया घालुन काही उपयोग नाही.

**मा.सभापती** :प्रशासनास ज्या सूचना/निर्णय सांगण्यात येतात त्याचे प्रशासन अतिशय सोप्यापध्दतीने घेतले जातात. काही ॲक्शन घेतली जात नाही. इतिवृत्त हा एवढा महत्वाचा विषय आहे. त्यामध्ये काय लिहुन येते हे आम्हाला कळायला हवे. भविष्यामध्ये सांगाल की, हे तुम्ही केलेले आहे. जे आम्ही केलेले नसेल. एखादी लाईन ओळ टाकली जाईल जी बोललेली नसेल. इतिवृत्त कन्फरमेशन काय असते.

**श्री.समीर राजुरकर** :उद्या माझ्या व स.सदस्य श्री.राजु वैद्य यांचे विरोधात लोक कोर्टात गेले की, हे अस बोलले त्याचे प्रुफ काय? उद्या न्यायालयात जावे लागले तर त्यास कोण जबाबदार?

**मा.सभापती** :इतिवृत्त केव्हा देणार खुलासा करण्यात यावा.

| | |
|---|---|
| **नगर सचिव** | **:यापुर्वी स्थायी समितीचे जे इतिवृत्त देण्यात आलेले आहे. विषय क्रमांक 33 ठेवण्यात आलेला आहे.** |
| **श्री.समीर राजुरकर** | **:कन्फरमेशन करण्याचा आमचा अधिकार आहे. त्या अधिकाराला छेद देण्यात येवु नये. सभा चालु देणार नाही. इतिवृत्त कोणते कन्फरमेशन करायचा तो आमचा अधिकार आहे.** |
| **मा.सभापती** | **:माझ्या कार्याकाळाबाबत सांगण्यात यावे. विषय क्रमांक 33 मध्ये 9 इतिवृत्त आलेले आहेत का?** |
| **नगर सचिव** | **:आलेले नाहीत. पुर्वी नगर सचिव विभागात स्टेनो/संगणक ऑपरेटर नाही ते देण्यात आले पाहिजे.** |
| **श्री.समीर राजुरकर** | **: असे उत्तर मिळत असेल तर आम्हाला इथे बसण्याची इच्छा नाही. स्टाफ नाही हा प्रशासनाचा प्रश्न आहे. 15 दिवसात इतिवृत्त देण्यात येईल असे सांगण्यात यावे. एवढा अपमान प्रशासनाने करू नये.** |
| **मा.सभापती** | **:या बाबतीत प्रशासनाने खुलासा करावा.** |
| **मा.प्र.आयुक्त** | **:आज या ठिकाणी नगर सचिव विभागातील विषय इतिवृत्त न मिळणेबाबतचा निघालेला आहे. त्यानुषंगाने जे इतिवृत्त राहिलेले असतील ते त्यांनी 15 दिवसांत पुर्ण करावेत. त्यांना जे आवश्यक कर्मचारी लागत असतील अनुभवी कर्मचारी ज्या ठिकाणी इतिवृत्त तयार होतात. सर्वसाधारण सभेची विषय पत्रिका तयार होते. त्यामुळे या विभागाची जी काही संवेदनशीलता आहे ती लक्षात घेऊन जबाबदार कर्मचारी, स्टेनोग्राफर त्या ठिकाणी उपलब्ध करून दिला जाईल.** |
| **श्री.रेणुकादास वैद्य** | **:5 वर्षापासून संबधीत कर्मचारी क्लर्क म्हणुन आहे ते स्टेनोचे काम करतात त्यांना स्टेनोचे पदनाम देण्यात यावे.** |
| **मा.प्र.आयुक्त** | **:स्टेनोची वेतनश्रेणी जास्त आहे.** |
| **श्री.रेणुकादास वैद्य** | **:सदरील कर्मचाऱ्यास पाच पाच वर्षापासून राबवुन घेऊ लागले आहे. तीन स्टेनोच्या जागा रिक्त आहेत.** |
| **मा.प्र.आयुक्त** | **:आवश्यक कर्मचारी यांचा आढावा घेऊन आवश्यक कर्मचारी दिले जातील आणि 15 दिवसांत इतिवृत्त पुर्ण केले जातील. या बाबतचे आदेश त्यांना दिले जातील.** |
| **श्री.विजेंद्र जाधव** | **:माझ्या माहितीप्रमाणे उपआयुक्त (प्र) यांचेकडे बरेच पदभार आहेत. त्यांचेवरील पदभार कमी करण्यात यावा.** |
| **श्री.समीर राजुरकर** | **:मा.न्यायालयाचा आदर ठेवुन पुढील सर्व बोलत आहे. दिनांक 23.11.2011 मध्ये टाऊन प्लॅनिंगने पत्र दिले प्रशासनाला. प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. त्यात आज आपण काही निर्णय घेऊ शकत नाही. परंतु नगर रचना चार उपयोगाचे शाखा अभियंता यांनी पहाणी व तपासणी केली असता संबधीत विकासकाने मंजूर नकाशाप्रमाणे काम न करता विना परवानगी अंतर्गत बदल केल्याचे आणि वॉचमन कॅबिन बांधल्याचे मुख्य इमारतीमध्ये मंजूरी नसतांना 2.85 मीटर सिलींग हाईटवर अंतर्गत स्लॅपचे काम सुरू केल्याचे निदर्शनास आले आहे. याबाबत आपल्या विभागाच्या निरक्षकास हे कळविलेले आहे आणि सदरील संचिका मुव्ह होत असतांना 29.03.2012 रोजी त्यांनी असे म्हटलेले आहे. अनाधिकृत बांधकाम निष्कासित करण्यासाठी प्रस्तावित केले होते. परंतु मा.आयुक्तांनी परिशिष्ट 19 मध्ये तजविजीनुसार मा.सहा.संचालक नगर रचना यांचा सुस्पष्ट** |

अभिप्राय अपेक्षित आहे. यापेक्षा सुस्पष्ट अभिप्राय काय पाहिजे. मुद्दामहुन संचिका फिरवायची. खालच्या खाली संचिका फिरवाच्या कायमच्या बंद झाल्या पाहिजेत पाच महिणेपुर्वी सुस्पष्ट अहवाल दिलेला आहे. मा.आयुक्तांनी एक दिवस पहिले त्यात लिहीले आहे. अतिरिक्त तपासा व अनाधिकृत असल्यास तात्काळ निष्कासित करा आणि अहवाल सादर करा. जर मा.आयुक्तांचे,नगरसेवकांचे ऐकायचे नाही. महापालिकेचे हितची जाण नाही. मग काम कशासाठी करायचे. (स.सदस्य श्री.समीर राजुरकर कागदपत्र मा.सभापती यांचेकडे सुपूर्द करतात) टाऊन प्लॅनिंगचा अहवाल सहा महिण्यांनी सुस्पष्ट नाही. असे म्हणत असेल तर सिलिंगचे काम अनाधिकृत आहे असे पत्र पाठविले जाते. तरीही कारवाई होत नसेल तर योग्य नाही. प्रत्येक विषयामध्ये असेच आहे. कुठेही गेले तरी प्रोग्रोसिव्ह पंचनामा करायचा नाही. पंचनामा केला की, लुफहोल सोडायचे. लुफहोल सोडले की, तो कोर्टात जायचे. कोर्टात गेल्यानंतर स्टे मिळायचा.

मागच्या बैठकीत उड्डाणपुलाच्या बाजुचा विषय काढण्यात आला होता. 51-ब च्या नोटीसचा सदरील संचिका सभागृहात बोलावुन घेण्यात यावी आणि त्या संचिकेमधील नोटींग वाचण्यात यावी. नोटींग वाचल्यानंतर कळेल की, हे सर्व कशासाठी चालले आहे. गंभिर आहे. 51-ब ची नोटीस देवुन कोर्टात स्टे मिळण्यासाठी करत आहे का? हे विभाग असेच चालत असेल तर मला नाही वाटत महापालिकेला खड्डयात घातल्याशिवाय राहणार नाही. या शहरातील अतिक्रमणे वाढतील. कुणावरही कारवाई होणार नाही. संचिका मागविण्यात यावी त्यानंतर निर्णय घेण्यात यावे.

श्री.विजेंद्र जाधव :माझ्या वार्डातील आरोग्य केंद्राची संचिका गेल्या दोन महिण्यांपासून फिरत आहे. संबधीत बीआय यांचे ते कारस्थान आहे. तीन बीआय पहिले कोणत्या पदावर होते याबाबत आस्थापना विभागास माहिती विचारणा केली होती. पुर्वीच्या बीआय यांना परत बोलविण्यात यावे. ते चांगले काम करीत होते. त्याशिवाय प्रशासकीय विभाग चांगला चालणार नाही.

श्री.नारायण कुचे :दोन तीन बैठकांपासून विषय चालू आहे. मा.आयुक्तांनी बीआयवर एफआयआर करण्याबाबत आदेशित केले होते. संचिकेवर काहीही लिहीले असेल परंतु सर्वांचीच जबाबदारी आहे.

मा.सभापती :यामध्ये कुणाला सोडायचा हा भाग नाही.

श्री.नारायण कुचे :मोठा मगर पकडले जावे असे सभागृहात सांगण्यात आले होते. सर्वांवर कारवाई करण्यात यावी.

श्री.विजेंद्र जाधव :वरिष्ठांनी सांगीतल्यावरही बीआय त्या ठिकाणी कारवाईसाठी जात नाही.

श्री.नारायण कुचे :स.सदस्यांवर उपोषणाची वेळ येते. त्यांना कोर्टात जायला लावतात.

मा.सभापती :सभागृहाने दखल घेतली आहे. प्रशासनाने खुलासा करावा.

श्री.समीर राजुरकर :या विषयामध्ये कारवाई करतांना कुणाला सस्पेंड करण्याची सभागृहाची इच्छा नाही. दोषारोपण करणे ही कारवाई जरूर केली पाहिजे. चेंन दोषी असेल तर कारवाई करण्यात यावी.

मा.सभापती :तशी सूचना मागील बैठकीत केली.

श्री.नारायण कुचे :तीन जणांणवर गुन्हे दाखल करा म्हणुन आदेशित केले होते. खुलासा करण्यात यावा.

मा.प्र.आयुक्त :चिकलठाणा येथील अनाधिकृत बांधकामाबाबतीत चौकशी अहवाल मा.आयुक्त यांना सादर केलेला होता. या अगोदरच्या बैठकीत झालेल्या चर्चेनुसार मा.आयुक्तांनी दिलेल्या आदेशानुसार चौकशी अहवाल मा.आयुक्त यांना देण्यात आलेला आहे. त्याबाबतीत स्थायी समितीने जे निर्देश दिले होते त्याबाबतीत टाऊन प्लॅनिंग, उपआयुक्त (सिडको) आणि इतर खाते त्या प्रकरणाशी त्यात्या वेळी संबध आला. त्यांचा जो कालापव्यय त्यावेळी झाला असेल त्याची जबाबदारी निश्चित करावी असे आदेश दिलेले आहेत. चौकशी अहवाला आम्ही जे मुद्दे मांडले त्याव्यरिक्त मा.आयुक्तांचेही काही मुद्दे मांडलेले आहेत. माझ्या वैयक्तिक अडचणीमुळे मला त्यात लक्ष घालता आले नाही. येत्या तीन दिवसात यासंबधीचा अहवाल पुन्हा देवुन निश्चित कार्यवाही केली जाईल.

श्री.नारायण कुचे :तीन जणांनवर गुन्हे दाखल करणार होते त्याचे काय झाले? गुन्हे दाखल केले किंवा नाही.

मा.प्र.आयुक्त :माझ्या माहितीप्रमाणे अजुन गुन्हे दाखल झालेले नाही.

श्री.नारायण कुचे :वर्तमानपत्रापुरते आहे का? मिडीयाला सांगण्यापुरते सांगीतले जाते का?

मा.प्र.्आयुक्त :या प्रकरणामध्ये जी जी कार्यवाही अपेक्षित आहे. ती करण्यात येईल.

श्री.नारायण कुचे :गुन्हे दाखल करणार आहे कि नाही एवढेच सांगण्यात यावे.

मा.प्र.आयुक्त :गुन्हे दाखल झालेले नाही. आवश्यक ती कार्यवाही तीन दिवसांत करण्यात येईल.

श्री.नारायण कुचे :हो किंवा नाही उत्तर देण्यात यावे.

मा.प्र.आयुक्त :तीन दिवसात कार्यवाही करणार.

श्रीमती सविता घडमोडे:वार्डातील पाण्याच्या समस्येसाठी प्रशासनाला प्रश्न सोडविण्यासाठी विनंती केली. अंदोलन केले. 100 ते 200 घरांना कायम पाण्याचा प्रश्न भेडसावत आहे. पाण्याची वेळ निश्चित नाही. वार्डातील बजेटची कामे होत नाही. मागील बजेटचे फाईलचे अधिकार राखुन ठेवले जातात. मॉ साहेब जिजाऊ उद्यानची संचिका, रस्त्याची, कम्युनिटी सेंटरची संचिका अशा अनेक संचिका पडुन आहेत.

मा.सभापती :श्री.खाजा आणि वार्ड इजिनिअर यांनी खुलासा करावा

उपअभियंता (श्री.खाजा):वार्ड क्रमांक 77 मध्ये काही उंचावर घर आहेत. 10 ते 15 घरांना पाणीपुरवठा होत नाही. त्या ठिकाणी सपोर्ट लाईन टाकण्याचा प्रयत्न करीत आहे.

मा.सभापती :पर्यायी व्यवस्था करण्यात यावी.

उपअभियंता (श्री.खाजा):प्रत्यक्ष जागेची पहाणी,सर्वेक्षण करून स.सदस्या यांचेशी चर्चा करून काय उपाययोजना करता येईल ते बघण्यात येईल.

मा.सभापती :प्रशासनाने ताबडतोब योग्य तो मार्ग काढुन समस्या सोडविण्यात यावी.

श्रीमती सविता घडमोडे :प्रत्येक बैठकीत सर्वसाधारण सभेत पाण्याविषयी प्रश्न मांडत आहे.

श्री.नारायण कुचे :पाण्याच्या टाकीवर अंदोलन करण्यात आले बऱ्याच दिवसांपासून स.सदस्या प्रश्न मांडत आहे.

उपअभियंता (श्री.खाजा) :10-15 दिवसात प्रश्न मार्गी लावला जाईल.

श्री.नारायण कुचे :संचिकेबाबत खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती :मागील बजेटचे किती कामे आहे. जे मार्गी लागले नाही.

**उपअभियंता(श्री.पी.जी.पवार)**:मॉ जिजाऊ उद्यान विकसीत करणे इस्टीमेट रक्कम 35 लाख संचिका प्रशासकीय मान्यतेसाठी गेलेली आहे. इतर संचिकेबाबत पुढील बैठकीत माहिती देण्यात येईल.

**मा.सभापती** :संचिका गहाळ झाल्यास संबधीत आवक जावक यांना सस्पेंड करण्यात येईल. संचिका कुठे आहे याबाबत लेखी माहिती येणाऱ्या स्थायी समितीपर्यंत देण्यात यावी.

**श्री.रेणुकादास वैद्य** :सणासुदीचे दिवस आलेले आहेत. साफसफाईचे बारा वाजलेले आहेत. सकाळी वार्डात चक्कर मारले असता कचऱ्याचे ढिग साचलेले आढळतात. याबाबत विचारणा केली असता लेबर आले नाही. गाडी आली नाही. म्हणुन सांगीतले जाते. त्या वार्डातील कचरा माझ्या वार्डात टाकला जातो यामुळे कचरा संपणार नाही. वार्डातील बॉर्डर क्लिन झाली म्हणजे वार्ड क्लिन झाला असे नही. साफसफाई व्हायला पाहिजे. शहर सुंदर दिसले पाहिजे. नियोजन कसे चालते. याबाबत खुलासा करण्यात यावा.

**श्री.समीर राजूरकर** :वार्डाचा अभ्यास करत असतांना दोन गोष्टी जाणवल्यात रॅम्के असतांना कॉम्पॅक्टर येत होते. पाच टनापेक्षा जास्त कचरा त्यात वाहिला जायचा महानगरपालिकेचा सद्या ज्या वाहनातुन कचरा आणला जातो. त्यात दोन टनापेक्षा जास्त कचरा घेऊन जाता येत नाही. जास्त कचरा नेल्यास गाडी अडकते. या वार्डाचा कचरा त्या वार्डात वार्डाचा कचरा नाल्यात पुन्हा नाले ब्लॉक याचे गंभिर चिंतन व्हायला पाहिजे.

**श्री.खान अक्रम करीम खान**:आमखास मैदानाच्या बाजुला कचऱ्याचे ढिग लागलेले आहे.

**मा.सभापती** :कचऱ्याबाबत नियोजन काय आहे.

**घनकचरा व्य.प्रमुख** :दूपारी 1 नंतर येणारा कचरा उचलला जात नाही. 1 च्या आत मनपाचे कर्मचारी काम करतात. प्रत्येक एरियामधील कचरा उचलला जातो.

**श्री.रेणुकादास वैद्य** :सभागृहाची दिशाभुल करू नये. दूपारनंतर कचरा जमा होण्याचे प्रमाण 2 ते 5 टक्के आहे. सकाळी 10 वाजेपर्यंत कचरा जमा होतो ते उचलुन नेण्याची जबाबदारी, नियोजन यांची आहे. याबाबतचे नियोजन काय आहे?

**घनकचरा व्य.प्रमुख** :कचऱ्याची समस्या प्रत्येक वार्डात आहे. वार्ड ड मध्ये जेसीबी दुरूस्तीसाठी टाकण्यात आल्यामुळे 10 दिवस काम बंद होते. यांत्रिकी विभागाने सहकार्य करायला हवे. मी आल्यापासुन प्रत्येक नगर सेवकाच्या वार्डात एक हायड्रॉलिक रिक्शा कचरा गोळाकरण्यासाठी लावण्यात आलेल्या आहेत. 1000 हातगाडयांसाठी मागणी केलेली आहे आणि 6 जेसीबीची मागणी केलेली आहे.

**मा.सभापती** :मॅनपावरबाबत व नियोजनाबाबत माहिती देण्यात यावी.

**घनकचरा व्य.प्रमुख** : वार्ड इ आणि ब वार्डासाठी 327 मजूर बचतगटामार्फत साफसफाईचे काम केली जाते.

**मा.सभापती** :नियंत्रण कोण करतो.

**घ.क.व्य.प्रमुख** :मी व वार्ड अधिकारी करतात.

**मा.सभापती** :चार वार्डात मजूर/कर्मचारी यांची संख्या बरोबर आहे.

**घ.क.व्य.प्रमुख** :चार वार्डात मजूरांची संख्या अपुरी आहे तसेच जे मजूर आहेत त्यातील अनेक मजूर आजारी व इतर कारणास्तव गैरहजर राहतात.

**मा.सभापती** :मा.आयुक्तांनी नियंत्रणासंदर्भात काही अधिकाऱ्यांचे आदेश निघालेले आहेत का? कुणाचे आदेश निघालेले आहे.

**घ.क.व्य.प्रमुख** :मा.उपआयुक्त (प्र) श्री.निकम, श्री.नाईकवाडे, श्री.पानझडे व इतर अधिकारी यांना 7 तारखेपासून आदेश देण्यात आले.

**मा.सभापती** :महापालिकेच्या आणि खाजगी वाहने किती लावण्यात आलेली आहे.

**उपअभियंता (यांत्रिकी)** : महापालिकेच्या आणि खाजगी वार्ड निहाय वाहने चालू आहे. वार्ड अ मध्ये मनपा-6 आणि खाजगी-4 ट्रक लोडींग रिक्शा-3, वार्ड ब मध्ये 12 ट्रॅक्टर, वार्ड क मध्ये 4 ट्रक्स आणि 5 ॲटोरिक्शा वार्ड ड मध्ये 5 ट्रक आणि 3 लोडींग रिक्शा वार्ड इ मध्ये 4 ट्रक,1 ट्रॅक्टर आणि 3 लोडींग रिक्शा चालू आहे.वार्ड फ मध्ये 4 ट्रक आणि लोडींग रिक्शा 4 चालू आहे.

**मा.सभापती** :पेमेंट,पेट्रोल,डिझेल नियोजन कसे आहे. कि.मी. ठरलेले आहे का? परट्रिप वर ठरलेले आहे.

**उपअभियंता (यांत्रिकी)** :रोजाप्रमाणे ठरलेले आहे. प्रत्येक दिवशी दोन ट्रिप कराव्यात असे ठरलेले आहे.

**मा.सभापती** :भाडे किती देण्यात येते.

**उपअभियंता (यांत्रिकी)** :ट्रकला 3150 रूपये दररोज

**मा.सभापती** :दोन ट्रिपची नोंद होती का?

**उपअभियंता (यांत्रिकी)** :होती. लॉगबुकवर एन्ट्री करण्यात येते आणि लॉगबुकप्रमाणे पेमेंट देण्यात येते.

**मा.सभापती** :डिझेलची व्यवस्था कोण करतो?

**उपअभियंता (यांत्रिकी)** :त्यांचे स्थरावर ते करतात. मेंन्टनन्स,ड्रायव्हर व इतर सर्व खर्च ते स्वतः करतात.

**मा.सभापती** :रिक्शाचे भाडे

**उपअभियंता (यांत्रिकी)** :दररोजचा 1050 भाडे आहे.

**श्री.रेणुकादास वैद्य** :ट्रकची संख्या एवढी लागते हे कशाच्या आधारे ठरवितात.

**उपअभियंता (यांत्रिकी)** :वेळोवेळी वार्ड ऑफिसर यांचेशी संपर्क साधुन माहिती घेण्यात येते. त्यांचे मागणीप्रमाणे पुरवठा करण्यात येतो.

**श्री.रेणुकादास वैद्य** :ड प्रभागाअंतर्गत 16 वार्ड येतात. त्यासाठी 10 ट्रक लावण्यात आलेले आहे. पाच डंम्पींग स्टेशन तयार करण्यात आलेले आहे एका डंम्पींग स्टेशनमधुन एक ट्रक कचरा निघतो. कमीत कमी एका वार्डात 2 ट्रक पाहिजे. 10 ट्रकवर सर्व नियोजन कसे बसविले जाणार. दोन ट्रिप होत नाही. कचऱ्याचे ढिग लागलेले असतात. याबाबतीत नियोजन करण्यात यावे. रोजच्या रोज कचरा उचलला पाहिजे.

**मा.सभापती** :दोन ट्रिप होत नाही.

**उपअभियंता (यांत्रिकी)** :जास्तीत जास्त दोन ट्रिप होतात. एक ट्रिप केली नाही तर एक हजार रूपये कपात करण्यात येते. वार्ड ऑफिसरच्या अहवालाशिवाय पेमेंट करण्यात येत नाही.

**मा.सभापती** :दोन ट्रिप केल्यास कचऱ्याचा त्रास होणार नाही. एकच ट्रिप करण्यात येते. रिक्शा संबधी नियम ठरविले असतील. किती बिलींग येते.

**उपअभियंता (यांत्रिकी)** :भाडे तत्वावरील वाहनांचा वार्षिक 24 ते 25 लाख रूपये बिलींग येते. वर्षाला साधारणतः2.75 कोटींचा खर्च येतो.

**मा.सभापती** :नविन वाहने,रिक्शा घ्यावयाच्या असतील तर कितीमध्ये पडतील.

उपअभियंता (यांत्रिकी) :10 लाखाला चेसीस येते. डंम्पर 12 ते 13 लाखापर्यंत येते.

मा.सभापती :याबाबतीत प्रशासनाने विचार करावा.

श्री.बाळासाहेब मुंडे :माझ्या वार्डात एक 407 सकाळी 7 वाजलेपासून डोअरटुडोअर कलेक्शन येते. फक्त दोन ट्रिप कचरा वार्डात निघतो. डायरेक्ट डंम्पींगवर कचरा नेला जातो.

मा.सभापती :वार्षिक बिलींग किती करण्यात येते. मनपाचे वाहन, मेंन्टनन्स, डिझेल यावरील खर्च. प्रशासनाने योग्य नियोजन करायला हवे. वार्षिक एकदाच नियोजन केले पाहिजे. चेसिस खरेदी करायला पाहिजे.

उपअभियंता (यांत्रिकी) :नियोजन केलेले आहे. काही वाहने मागविण्यात आली आहे. वार्ड ऑफिसरशी विचारविनीमय करून आणखी काही नियोजन करता येईल का हे पाहण्यात येईल.

मा.सभापती :एवढे मोठे प्रमाणात नुकसान मनपाचे होत आहे. जेसीबी भाडयाने लावलेल्या असुन प्रत्येकतासाचा जेसीबीचा दर आकरण्यात येतो.

उपअभियंता (यांत्रिकी) :सध्या बंद आहे. आवश्यकता पडलीतर लावण्यात येते.

मा.सभापती :प्रत्येकी तास कॅलक्युलेशन करायला पाहिजे. एक जेसीबी आला असता. शहर अभियंता प्रशासनाला हि माहिती द्यायला पाहिजे होते. मनपाच्या प्रत्येकी किमीचा ॲव्हरेज किती आहे.

उपअभियंता (यांत्रिकी) :तीन ते चारचा ॲव्हरेज आहे. किमी रिडींग चालू आहे. 407 ला 30 लीटर आणि जेसीबीला 50 ते 60 देण्यात येते.

मा.सभापती :डिझेल किती भरण्यात येते याबाबतची माहिती देण्यात यावी. शहरातील कचरा उचलने बाबत (वाहतुकीचे) नियोजन करणे.

उपअभियंता (यांत्रिकी) :तीन वार्डाचे खाजगीकरणाचा निर्णय घेतलेला आहे. संचिका तयार करण्यात आलेली आहे.

मा.सभापती :कंन्सलटंट नेमणेबाबत प्रशासनाने आदेश दिले आहे का? या संबधी प्रशासनाने संबधीत अधिकारी यांना आदेश देवुन प्रोजेक्ट रिपोर्ट तयार करण्यात यावा. मा.आयुक्तांनी श्री.पानझडे यांना प्रोजेक्ट रिपोर्ट तयार करण्यासाठी सांगण्यात आले आहे. 15 दिवसात घनकचरा व्य.प्रमुख यांनी सहकार्य करून अहवाल तयार करण्यात यावा.

श्रीमती प्राजक्ता राजपूत :सांस्कृतिक मंडळासमोरील ड्रनेजचा प्रश्न सोडविल्याबद्दल प्रशासनाचे, मा.आयुक्त, मा.सभापती यांचे धन्यवाद करण्यात येते.

मा.सभापती :मोठा विषय होता तो मार्गी लावल्याबद्दल प्रशासनाचे धन्यवाद.

श्री.समीर राजूरकर :एमजीएम येथे नाला आहे. नाल्यांचे सर्वे करण्याचे काम प्रशासनाकडुन चालु आहे. एमजीएम नाल्याची तुटक प्रमाणात शिट माझ्याकडे आहे. माझ्या डोळयांनी मी पाहिलेले आहे की, नाला मॅन्युअली 60 फुटांचा होता. एमजीएम, सहारा हॉटेल पासून ते मोतीवाला नगरच्या ले आऊट पासून बसैय्ये नगरच्या लेआऊट पासून जाफरगेट कडे पुढे जातो. अपेक्स हॉस्पीटलच्या आडव्या येणाऱ्या रोडकडे नाली झालेली आहे. त्यावर भराव टाकुन चार प्लॉट तयार केलेत. मनपाच्या ड्रेनेज विभागाने त्यांना बाजुने ड्रेन काढण्याची परवानगी दिलेली आहे. ड्रेन कोणत्या व कशाच्या आधारे काढुन देतात. त्याठिकाणी मनपाचा ओपन स्पेस मधुन नाला जात होता कॉर्नरचा एका प्लॉटचा कट करत होता त्या ठिकाणी आता घर झालेले आहे. त्यांनी तो बाजुला शिफ्ट केलेला आहे का?

**उपअभियंता (श्री.निकम) :एमजीएम पासून जो नाला निघत आहे तीथे दोन ले आऊट मंजूर झालेले आहेत. मोतीवाला नगर सन 1982 ला मंजूर झालेला आहे. बसैय्ये नगर जो सन 1980 ला मंजूर झालेला आहे. डिपी प्लॅनमध्ये हा नाला दाखवलेला नाही. पण प्रत्यक्षात जागेवर पाणी प्रवाह आहे आजही आहे.**

**श्री.समीर राजुरकर :30 ते 50 वर्षापुर्वीची शिट आहे त्यामध्ये नाला दाखविण्यात आला आहे. प्रत्यक्षदर्शी त्या राहणाऱ्या लोकांना माहिती आहे की, त्या ठिकाणी नाला आहे. नाला बजुने पाच प्लॉट तयार केलेले आहे. ज्याला जसे घर बांधायचे तसा नाला शिफ्ट केलेला आहे. अपेक्सजवळ 50 फुटांचा राहिलेला आहे. एमजीएम समोर नाली केलेली आहे. पाऊस पडल्यावर तिथुन ड्रेन काढलेले आहे नाल्यामध्ये आणि पुढे पाणी जातच नाही. मोतीवाला, बसैये नगर ले आऊटमध्ये पुर्ण पाणी साचले जाते. मोठया प्रमाणात पाऊस झाल्यास त्या ठिकाणी तळ साचेल. पाण्याचा नैसर्गिक प्रवाह बदलण्यात येवु नये. भविष्यात त्याचे भयंकर प्रकार घडु शकतात.**

**मा.सभापती :50 फुटाचा नाला डिपीवर असेल.**

**उपअभियंता (श्री.निकम) :डिपीवर नाला नाही.**

**मा.सभापती :सन 1995 ला डिपी प्लॅन झाला होता.**

**उपअभियंता (श्री.निकम) :एमजीएम पासून दादा कॉलनीपर्यंतचा नाला डिपीमध्ये दाखवला नाही. जाफरगेट ते दादाकॉलनी पर्यंत थोडा दाखविण्यात आला आहे.सर्वे नं.17,15,20 असे आहे.**

**श्री.समीर राजुरकर :माझ्याकडील शिटमध्ये नाला दाखविण्यात आला आहे. सिटीसर्वे ऑफिसने केलेले आहे. नागरीकांच्या घरात पाणी शिरल्यास त्यांचेकडे नागरीक जात नाही. महापालिकेकडे येतात. त्याचा अतिरीक्त बोजा महापालिकेवर पडणार आहे. नाला मोकळा झाला पाहिजे या संदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयाशी संपर्क साधुन सांगीतले पाहिजे. अडीच एकर शैक्षणिक झोनची आरक्षणची जागा आहे. महापालिकेचा त्या ठिकाणी एकही बोर्ड नाही. कायदेशिर बाबी तपासून मनपाचा बोर्ड लावला पाहिजे.**

**मा.सभापती :न्यायालयीन काही प्रकरण आहे का?**

**उपअभियंता (श्री.निकम) :प्रकरण पहावे लागेल.**

**मा.सभापती :वार्ड इंजिनिअर, संबधीत अधिकारी, झोन अधिकारी यांनी नाल्याची वस्तुस्थिती बघावी.**

**उपअभियंता (श्री.निकम) :सुरवातीला जे सहा नाले सर्वेक्षणासाठी घेतलेले आहे त्यामध्ये या नाल्याचा समावेश आहे. सिटी सर्वेकडुन सर्वेक्षण झालेले आहे. त्यांचेकडुन लवकरच अहवाल मिळेल.**

**मा.सभापती :ॲक्शन पॉंईटबाबत खुलासा आलेले नाहीत. पुढील बैठकीत खुलासा घेण्यात येईल.**

**विषय क्र. 33 :** **(विषय क्र. 19 पुढील सभेत ठेवण्याबाबत दि. 03/08/2012 रोजीच्या सभेतील निर्णयाप्रमाणे)**

**दिनांक 21/02/2011 (का.प.क्र.12), 14/03/2011 (का.प.क्र.13), 21/03/2011 (का.प.क्र.14), 22/03/2011 (का.प.क्र.15), 13/04/2011 व 15/04/2011 (दि.13/04/2011 ची तहकुब सभा) (का.प.क्र.16) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभांचे इतिवृत्त कायम करणे.**

**टिप : (इतिवृत्तांताच्या प्रती यापूर्वीच सर्व संबंधीतांना वितरीत करण्यांत आलेल्या आहेत.)**

**ठराव :**

**प्रस्तुत प्रस्ताव स्थगित ठेवण्यांत यावा, असे सर्वानुमते ठरले.**

**विषय क्र. 34 :**

**प्रस्ताव सादर करण्यांत येत आहे की, श्री.मिर साबेर अली सिद्दीकी, मिश्रक, आरोग्य विभाग यांची वडीलांच्या आजारपणावर (RHD c Sev. Calcified CAG- Triple Vessel Disease) त्यांनी दाखल केलेल्या देयकापैकी प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेली रक्कम रू.2,98,062/- एवढी आहे. अनुज्ञेय रक्कम रू.2,98,062/- च्या 90% रक्कम रू.2,68,255/- (अक्षरी रू.दोन लाख अडुसष्ट हजार दोनशे पंचावन्न फक्त) पैकी 5% रक्कम रूपये 16,383/- (अक्षरी रूपये सोळा हजार तीनशे त्र्याऐंशी मात्र) (एकुण देयक रक्कम रू.3,37,665/- च्या 5% प्रमाणे) मनपा फंडात जमा करून उर्वरित र.रू.2,51,872/- (अक्षरी रूपये दोन लाख एक्कावन्न हजार आठशे बहात्तर मात्र) एवढ्या वैद्यकीय खर्चास मान्यता देण्याबाबत प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.**

**मा.सभापती** : **मंजूर. खुलासा करण्यात यावा.**

**आरोग्य वै.अधिकारी** :**दिड लाखापर्यंतचे मेडीकल परतावाचे बील असेल तर त्याचे अधिकार प्रशासनाला आहे. त्यापुढील मेडीकल परतावाचे बील असेल तर त्याचे अधिकार मा.स्थायी समितीला आहे. आस्थापना विभागामार्फत प्रस्ताव ठेवण्यात आलेला आहे.**

**मा.सभापती** :**विषय मंजूर.**

**ठराव :**

**प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.मिर साबेर अली सिद्दीकी, मिश्रक, आरोग्य विभाग यांची वडीलांच्या आजारपणावर (RHD c Sev. Calcified CAG- Triple Vessel Disease) त्यांनी दाखल केलेल्या देयकापैकी प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेली रक्कम रू.2,98,062/- च्या 90% रक्कम रू.2,68,255/- (अक्षरी रू.दोन लाख अडुसष्ट हजार दोनशे पंचावन्न फक्त) पैकी 5% रक्कम रूपये 16,383/- (अक्षरी रूपये सोळा हजार तीनशे त्र्याऐंशी मात्र) (एकुण देयक रक्कम रू.3,37,665/- च्या 5% प्रमाणे) मनपा फंडात जमा करून उर्वरित र.रू.2,51,872/- (अक्षरी रूपये दोन लाख एक्कावन्न हजार आठशे बहात्तर मात्र) वैद्यकीय खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.**

**विषय क्र. 35 :**

**मा.उच्च न्यायालय मुंबईचे औरंगाबाद खंडपीठाने याचिका क्र.6998/2011 दिनांक 10/07/2012 रोजी दिलेल्या निर्णयानुसार श्री.एम.एन.बावस्कर, कनिष्ठ लिपीक (सध्या सेवेतून बडतर्फ) मनपा, औरंगाबाद यांनी कार्यालयीन आदेश क्रमांक मनपा/आस्था-1/2011/1284, दिनांक 07 सप्टेबंर 2011 अन्वये त्यांना महानगरपालिका सेवेतून बडतर्फ केल्याच्या आदेशाविरूध्द स्थायी समितीकडे सादर केलेल्या अपिलावर विचार विनिमय करून निर्णय घेणे.**

**मा.सभापती** :**अपिला संदर्भात श्री.बाविस्कर यांनी आपले म्हणणे सभागृहासमोर मांडावे.**

**श्री.एम.एन.बावस्कर** :**मी सादर केलेल्या अपिलावर खुलासा सादर करत आहे. अपिलावर लेखी खुलासा सादर केलेला आहे. संक्षिप्त खुलासा सादर करीत आहे. माझी चौकशी करतांना चौकशी अधिकारी यांनी माझी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतलेली नाही. साक्षी पुरावे तपासले नाही. कोणतेही कागतदपत्र दाखविले नाही. एकतर्फी चौकशी करण्यात आलेली आहे. त्यामुळे सर्व आरोप मला मान्य नाहीत.**

**दोषारोप क्रमांक 1 :- मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाचा विपरीत अर्थ लावून कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीस मदत करुन मा.उच्च न्यायालय व मनपा प्रशासनाची दिशाभूल करणे.**

**सदरील दोषारोपाचे अवलोकन केले असता, मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाचा विपरीत अर्थ लावून कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीस मदत**

करुन व मा.उच्च न्यायालय व मनपा प्रशासनाची दिशाभूल केली असा दोषारोप असल्याचे दिसून येतो. मी यापुर्वीही मा.चौकशी अधिकारी यांचेकडे वेळोवेळी निवेदन सादर केलेले असून त्यात सुध्दा नमूद केले आहे की, दैनिक वेतनावरील कामागारांची जेष्ठता यादी सन 1994-1995 मध्ये झालेली असून त्यावेळेस मी आस्थापना-2 विभागात कार्यरत नव्हतो. मी आस्थापना-2 शाखेत दिनांक 1/1/1997 ला आलेलो आहे. त्यामुळे मला हा आरोप मान्य नसुन मला या आरोपातुन मुक्तता करावी ही विनंती.

दोषारोप क्रमांक 2 :- काही प्रकरणांत कर्मचाऱ्यांच्या नावात बदल हा महाराष्ट्र शासनाचे राजपत्राचे आधारे व काही प्रकरणांत मा.उच्च न्यायालयाचे निर्देशानुसार नावात बदल करता येतो, अशी विसंगत मते आपल्या अधिकारात (अधिकार नसतांना) नोंदवून वरिष्ठांची व मनपा प्रशासनाची दिशाभूल केली आहे.

सदरील आरोप हा मोघम स्वरूपाचा असुन त्यामध्ये कोणताही विषय स्पष्ट नमुद केलेला नाही. तरी मा.महोदयांच्या निर्दशनास आणुन इच्छितो की, कर्मचाऱ्यांचे नावात बदल करण्यासाठी श्री विजय बंडू शेजूळ अर्ज दिलेला होता. सदरील अर्ज हे मी लिपीक संवर्गातील कर्मचारी असल्याने सादर केलेले नसते तर माझेविरुध्द वेगळयाने विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली असती. करिता मी लिपीक पदाच्या कार्यक्षेत्रात राहून वरिष्ठांकडे आदेशास्तव प्रकरणे सादर केली होती. मी दिनांक 7/10/2004 रोजी सादर केलेल्या टिपणीचे अवलोकन केले असता, श्री. विजय बंडू शेजवळ यांनी दिनांक 26/2/2004 रोजी महाराष्ट्र शासन राजपत्र याद्वारे नावात दुरुस्ती करुन आणलेली असल्याने राजपत्रात नावाची दुरुस्ती झाल्यानुसार व त्यांच्या शैक्षणीक कागदपत्रानुसार संतोष बंडू शेजुळ ऐवजी विजय बंडू शेजवळ असे नांव दुरुस्ती करण्याचा प्रस्ताव विचारार्थ सादर केला अशी टिपणी सादर केलेली आहे आणि त्यास उपआयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे. त्यामुळे माझ्यावर लावण्यात आलेला आरोप मला मान्य नुसन कृपया मला दोषमुक्त करावे. ही विनंती.

दोषारोप क्रमांक 3 :- विधी विभागाने स्पष्ट अभिप्राय देऊनही ते वरिष्ठांपासून जाणुनबूजून दडवून ठेवून नांव राजपत्राचे आधारे बदल करुन वरिष्ठांची व मनपा प्रशासनाची दिशाभूल करणे.

उपरोक्त दोषारोप आणि क्रमांक 2 चा आरोप सारखाच असल्यामुळे माझे स्पष्टीकरण तेच समजण्यात यावे. ही नम्र विनंती. मला दोषमुक्त करावे. ही विनंती.

दोषारोप क्रमांक 4 :- मुळ कर्मचाऱ्यांची नांवे बदलून चुकीच्या/बनावट उमेदवारांस नियुक्ती देण्यास मदत करणे.

मी यापुर्वीही मा.चौकशी अधिकारी यांचेकडे वेळोवेळी निवेदन सादर केलेले असून त्यात सुध्दा नमूद केले आहे की, 1124 पदे भरण्याच्या प्रक्रियेत सन 2003 मध्ये मला समाविष्ट करुन घेण्यात आलेले नव्हते व माझेकडे 1124 पदे भरतांना कोणतेही काम देण्यात आलेले नव्हते त्यांना 1124 भरती प्रकरणाशी माझा संबंध येत नसतांना माझेवर सदरील दोषारोप चुकीचा लावण्यात आलेला आहे. कृपया मला दोषारोपातुन मुक्त करावे ही विनंती.

**दोषारोप क्रमांक 5 :- निवड समितीसमोर प्रकरण सादर करतांना प्रकरणाची पुर्णतः जाणीव असून सुध्दा इत्तंभूत माहिती जाणुनबूजून सादर न करणे, आरक्षण, शैक्षणिक अर्हता विभागास व पदास मान्यता नसतांना पदे भरणे.**

**मा.महोदय मी यापुर्वीचे दोषारोपात नमूद केल्यानुसार माझेकडे 1124 पदे भरतांना कोणतेही काम देण्यात आलेले नव्हते, करिता 1124 भरती प्रकरणाशी माझा संबंध येत नसतांना माझेवर सदरील दोषारोप चुकीचा लावण्यात आलेला आहे. तरी मला सदरील दोषारोपातून मुक्त करण्यात यावे,ही विनंती.**

**दोषारोप क्रमांक 6 :- निवड समितीसमोर चुकीची माहिती सादर केल्याने शिपाई, माळी, सेवक/सेविका ही पदे शासनाने मान्यता केली असतांना सुध्दा सर्वांना मजूर म्हणून नियुक्ती देण्यात आलेली.**

**मा.महोदय, माझेकडे 1124 पदे भरतांना कोणतेही काम देण्यात आलेले नव्हते, करिता निवड समितीसमोर चुकीची माहिती सादर करण्यास माझा संबंध येत नसतांना माझेवर सदरील दोषारोप चुकीचा लावण्यात आलेला आहे असा खुलासा चौकशीत सादर करण्यात आलेला आहे. सदरील आरोप चुकीचा लावण्यात आलेला आहे. कृपया मला दोषारोपातून मुक्त करण्यात यावे,ही विनंती.**

**दोषारोप क्रमांक 7 व 8 सिध्द झाले नसल्याने त्याच्याबाबतीत मला काहीही सांगायचे नाही.**

**दोषारोप क्रमांक 9 :- साफसफाई विभागाच्या जेष्ठता यादीतील श्री सिध्दार्थ भिमराव दाभाडे, यादी क्र.266 हा कर्मचारी 1997 मध्ये लाड समितीच्या शिफारशीनुसार नियुक्ती देण्यात आली. 1998 मध्ये याच नावाने दुसऱ्या व्यक्तीस नियुक्ती देण्यात आली.**

**मा.महोदय, सन 1997 मध्ये श्री सिध्दार्थ भिमराव दाभाडे यांची नियुक्ती लाड समितीच्या नियमानुसार झाल्यानंतर 1998 मध्ये याच नावाने दुसऱ्या व्यक्तीस मी नियुक्ती दिलेली नाही.त्या वेळेस माझ्याकडे दै.वेतनावर नियुक्ती देण्याचे काम नव्हते, ते काम तत्कालीन लिपीक श्री एम.बी.खरे यांचेकडे होते. त्यामुळे याबाबीशी मी जबाबदार नाही.**

**कृपया सदरील दोषारोपातून मला दोषमुक्त करावे,ही विनंती.**

**करिता विनंती की,**

**1. अर्जदार यांचा अपील अर्ज मंजूर करावा.**

**2. मा.आयुक्त,महानगरपालिका, औरंगाबाद यांचे आदेश क्र.मनपा/आस्था-1/2011/1284 दिनांक 7/9/2011 रद्यबातल करुन अर्जदार यांना कनिष्ठ लिपीक,महानगरपालिका, औरंगाबाद या पदावर दिनांक 7/9/2011 पासून पुर्वलक्षी प्रभावाने कामावर घेण्यात यावे, ही नम्र विनंती.**

**मा.सभापती** :**प्रशासनाने खुलासा करावा.**

**आस्थापना अधिकारी-1** :**श्री.एम.एन.बावस्कर यांचेवर खाते चौकशी प्रस्तावित करण्यात आली होती. खाते चौकशी अंती चौकशी अधिकारी यांनी दिलेला अहवाल, दोषारोप, नोंदविलेले चौकशी निष्कर्ष पुढील प्रमाणे आहे.**

१. मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाचा विपरित अर्थ लावून कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीस मदत करुन मा.उच्च न्यायालय व मनपा प्रशासनाची दिशाभूल करणे. असा दोषारोप ठेवण्यात आलेला होता.

याबाबत साक्ष देतांना मधुकर बावस्कर यांनी 1124 भरती प्रकरणात कोणताही संबध येत नसल्याचे नमुद सांगुन पदे भरणा प्रक्रीयेमध्ये त्यांना समाविष्ट नव्हते. सन 1994-95 मध्ये ते अस्थापना-2 विभागामध्ये कार्यरत नव्हते असा साक्षीत उल्लेख केलेला आहे. परंतु आस्थापना शाखेचे हजेरीपुस्तक पहाता ते आस्थापना शाखेत दिनांक 16.06.2003 रोजी दुसऱ्यांदा नेमणुक मिळाली होती व अपचारी पुर्वी आस्थापना -2 मध्ये काम करीत होते. सन 1994-95 मध्ये दैनिक वेतनाच्या कामगारांची यादी तयार झाल्यानंतर जे कर्मचारी मा.न्यायालयात गेले होते. न्यायालयाने त्यांची नांवे यादीत समाविष्ट करण्यापुर्वी मनपाने एक समितीस्थापुन त्यामध्ये वादी कर्मचारी होते त्यांना त्यांचे जेष्ठता यादीत नांव समाविष्ट करण्याचा निर्णय उमेदवाराने पुरावा दिल्यानंतर समितीने पाहुन निर्णय घेण्याचे आदेश दिले होते. परंतु श्री.मधुकर बावस्कर यांनी स्वत: सादर केलेल्या स्वाक्षरी केलेल्या संचिकेत श्री.रविंद्र तुकाराम प्रधान, श्री.राजु सुर्यभान गवळे, श्री.राजेंद्र खरात, श्री.लक्ष्मण मोरे, श्री.कर्मचारी लव्हेरा, श्री.शिवाजी खोतकर, श्री.अनिल बाबुराव जाधव, श्री.रविंद्र विठ्ठलराव कांबळे, श्रीमती मिनाबाई प्रकाश रणनविर, श्री.सुरेश गरूड

या न्यायालयात गेलेल्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत संबंधित संचिका पडताळून पाहिली असता मा.न्यायालयाने जे आदेश दिले होते त्याकडे दुर्लक्ष करुन त्याचा विपरीत अर्थ लावून त्यांची नांवे जेष्ठता यादीमध्ये घेण्यासाठी कोणाताही सक्षम अधिकाऱ्याची मंजूर न घेता जेष्ठता यादीत नांव समाविष्ट करुन त्यांच्या नियुक्तीस मदत केली व मा.न्यायालयाची व मनपाच्या प्रशासनाची दिशाभुल केली म्हणून हा दोषारोप सिध्द होतो

<u>दोषारोप क्रमांक 2 :- काही प्रकरणांत कर्मचाऱ्यांच्या नावात बदल करून महाराष्ट्र शासनाचे राजपत्राचे आधारे व काही प्रकरणांत मा.उच्च न्यायालयाचे निर्देशानुसारच नावात बदल करता येतो, अशी विसंगत मते आपल्या अधिकारात (अधिकार नसतांना) नोंदवून वरिष्ठांची व मनपा प्रशासनाची दिशाभूल केली.</u>

यामध्ये अपचारी कर्मचारी यांनी प्रशासनास दिनांक 09.07.2007 रोजी कारणे दाखवा नोटीस देऊन संतोष शेजुळ ऐवजी विजय बंडुजी शेजुळ या नावांत बदल करण्यात आल्याचे संचिकेबाबत नांव बदली संबधाने विधी विभागाने अभिप्रायाकडे दुर्लक्ष करून नावांत दुरूस्ती का केली याबाबत खुलासा विचारला असता अपचारी कर्मचारी श्री.मधुकर बावस्कर यांनी उपरोक्त संतोष शेजुळ ऐवजी विजय बंडुजी शेजुळ असा नांव दुरूस्ती प्रस्ताव सादर केला असता. प्रथम त्यांनी विनंती अमान्य करण्यात आलेली होती. परंतु विजय बंडुजी शेजुळ यांनी पुन्हा अर्ज सादर करून नांव दुरूस्तीची मागणी केलेली होती. यासोबत अर्जदाराने नांवात झालेला बदल संदर्भाने पुरावे सादर केले त्या पुराव्यामध्ये विजय बंडुजी शेजुळ या नावांचा उल्लेख आहे. याचे पुर्वीचे नांव संतोष शेजुळ असे होते. याचा सबळ पुरावा संचिकेत कुठेही आढळुन आला नाही. सबब या नावांने

हेराफेरी व अनियमितता आढळुन आल्यामुळे त्यांची स्वतंत्र चौकशी करण्यासाठी अधिकारी नेमुन सर्व प्रकरणाची प्राथमिक चौकशी करण्यात आली होती. प्राथमिक चौकशी अधिकारी यांनी संतोष शेजुळ अनुक्रमांक यादीतील क्रमांक 31 वरील नावांमध्ये बदल करण्यात आला. सदरचे प्रकरण संशयास्पद असल्याचा अहवाल दिलेला आहे. तसेच संबधीत विजय बंडुजी शेजुळ यांना प्रत्यक्ष बोलावुन माहिती घेतली असता 1995 मध्ये प्रत्यक्ष यादी तयार करतांना ते सुनावणीस उपस्थित असल्याबाबत कोणताही पुरावा प्रतिक्षा यादी झाल्यानंतर नांवातील बदलाबाबत काही आक्षेप घेतला नसुन केवळ सेवेत कायमचे आदेश मिळाल्यानंतर नांव बदलाबाबत कार्यालयास कळविले होते. शिवाय सन 1998 मध्ये मुळ नेमणुक संतोष शेजुळ यांनावाने दिला असतांना त्यात मुळ नांव वेगळे तर वडीलांच्या नावांचा उल्लेख नाही. इतकेच नव्हेतर आडनांव शेजुळ असे आहे म्हणुन शेजुळ आणि शेजवळ या नावाचा साम्यचा गैर फायदा घेऊन विजय बंडुजी शेजवळ यांनी घेतला असावा असा संचिकेवरून दिसुन येते. नावांत बदल करणेची कार्यवाही श्री.मधुकर बावस्कर, यांनी जशी काळजीपुर्वक हाताळायला पाहिजे होते. तशी हाताळली नसल्याचे दिसुन येते . वास्तविक संचिकेत उपलब्ध कागदपत्रावरून तत्कालिन सहायक आयुक्त-2 यांनी हे प्रकरण 7.11.2003 च्या टिपणीवरून बंद केले होते. असे असतांना अपचारी कर्मचारी यांनी हे प्रकरण पुन्हा त्यांचे दिनांक 11.07.2004 च्या टिपणीत नांव बदल करणेचा प्रस्ताव कसा सादर केला हे समजत नाही. यावरून असे स्पष्ट होते. अपचारी कर्मचारी केवळ यादीतील अनुक्रमांक 61 वरील नावाचा फायदा देणेसाठी विजय बंडुजी शेजवळ यांना मदत केली. मनपा प्रशासनाची दिशाभुल केली. त्यांचेवरील दोषारोपाचे खंडण करण्यासाठी त्यांचे निवेदनात व अभिवेदनात कोणताही सबळ पुरावा दिलेला नाही. त्यामुळे त्यांचेवरील हा दोषारोप सिध्द होतो.

दोषारोप क्रमांक 3 :- विधी विभागाने स्पष्ट अभिप्राय देऊनही ते वरिष्ठांपासून जाणुनबूजून दडवून ठेवून नांव राजपत्राचे आधारे बदल करुन वरिष्ठांची व मनपा प्रशासनाची दिशाभूल करणे.

चौकशी अंती सदरील आरोप सिध्द झाल्याचे चौकशी अधिकारी यांनी काढलेला आहे.

दोषारोप क्रमांक 4 :- मुळ कर्मचाऱ्यांची नांवे बदलून चुकीच्या/बनावट उमेदवारांस नियुक्ती देण्यास मदत करणे.

श्री.एम.एन.बावस्कर यांनी 1124 भरती प्रक्रीयेत सहभागी नसल्याचे सांगुन बनावट उमेदरावास नियुक्ती देण्यास मदत केली नाही अशी साक्ष नोंदविली आहे. हे म्हणने चुकीचे आहे. कारण ते आस्थापना-2 मध्ये कार्यरत असतांना मा.न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे जेष्ठता सुचीमध्ये जी नांवे होती. त्यांना त्याच नांवाने नेमणुक देणे ऐवजी अपचारी कर्मचारी यांनी चौकशी समितीचे निर्दशनास आणण्यानुसार अनेक नांवात बदल करून नेमणुक आदेश दिले असे चौकशी समितीने मा.आयुक्त यांचे निर्दशनास आणुन दिले आहे. यावरून आस्थापना शाखेतील कनिष्ठ लिपीक म्हणुन यातील मुळ नांव नेमणुक आदेशातील नांव एकच असावयास होते परंतु चौकशी अहवालानुसार सुनिता यमाजी मिसाळ यांना

आदेश दिला तर कागदपत्रावरून त्यांचे खरे नांव सुमनबाई प्रकाश मिसाळ असे होते. तसेच आस्थापना शाखेतु नेमणुक आदेश काढतांना कमलबाई अशोक पाटोळे यांना आदेश दिले त्यांनी सादर केलेल्या कागदपत्रावरून मालनबाई अशोक पाटोळे असे नांव आहे. याशिवाय नियुक्ती आदेश सुमनबाई भिमराव यांना देण्यात आले मात्र जेष्ठता यादीत सुमनबाई आंधळे असे आहे. दैनिक वेतनमुदतवाढ सुमनबाई फराळे असे आहे. यावरून जेष्ठता यादीतील नांव व नेमणुक आदेशात दिलेले नांव यामध्ये फरक आहे. तसेच दोषारोप क्रमांक 3 मध्ये संतोष शेजुळ याचे ऐवजी बंडुजी शेजुळ या नांवाने बनावट आदेश निर्गमित केले शिवाय या दोषारोपाबाबत अपचारी कर्मचारी यांती अत्यंत त्रोटक खुलासा सादर करून त्यांचेवर ठेवण्यात आलेल्या दोषारोपाचे खंडण करणेसाठी कोणताही ठोस पुरावा दिला नाही म्हणुन हा दोषारोप सिध्द होतो.

दोषारोप क्रमांक 5 :- निवड समितीसमोर प्रकरण सादर करतांना प्रकरणाची पुर्णतः जाणीव असून सुध्दा इत्तंभूत माहिती जाणुनबूजून सादर न करणे, आरक्षण, शैक्षणिक अर्हता विभागास व पदास मान्यता नसतांना पदे भरणे. असा दोषारोप ठेवण्यात आला होता.

यामध्ये त्यांनी त्यांचे साक्षीत भरती प्रक्रीयेत सहभागी नसल्यामुळे कुठल्याही प्रकारची चुकीची माहिती दिली नाही असा दोन ओळीचा त्रोटक खुलासा देवुन आरोपाचे खंडन केलेले आहे. कोणताही ठोस पुरावा दिलेला नाही. 1124 पदे भरण्यासंबधीचे कामकाज आस्थापना-2 विभागात झ ाालेले असुन उपलब्ध संचिका पडताळुन पाहिली असता. आस्थापना 2 विभागात अपचारी कर्मचारी होते. मंजूर झालेली पदे व त्यावरील भरती प्रक्रीया पुर्ण करणेसाठी संपुर्ण माहिती निवड समितीला पुरवणे त्यांचे काम होते वास्तविक शासन निर्णय 10.11.2003 मध्ये जोडपत्र 1 मध्ये 19 विभागामध्ये संशोधन केंद्र, महापौर निवास इत्यादी अशा 11 विभागामध्ये 3 लिपीकासह असे एकुण 59 कर्मचारी अपचारी कर्मचारी यांनी नियुक्ती करण्यासाठी त्यांचे वरिष्ठाकडे सादर केल्याचे दिसुन येते. शासन निर्णयावर दर्शविलेल्या विभागासाठी कोणत्याही नविन पदाची निर्मिती केली नाही असे स्पष्ट नमुद असतांना आस्थापना कर्मचारी आस्थापना 2 असल्यामुळे शासन निर्णयात ज्या विभागांना पदांची मंजूरी झालेली नाही. त्या विभागात पद भरण्याची प्रक्रीया प्रस्तावित केली हा दोषारोप सिध्द होतो असा अभिप्राय दिलेला आहे.

दोषारोप क्रमांक 6 :- निवड समितीसमोर चुकीची माहिती सादर केल्याने शिपाई, माळी, सेवक/सेविका ही पदे शासनाने मान्यता केली असतांना सुध्दा सर्वांना मजूर म्हणून नियुक्ती दिलेली आली.

या बाबत श्री.मधुकर बावस्कर, यांना दोषारोप बाबत खुलासा प्रक्रीयेत सहभागी नसल्यामुळे हा दोषारोप त्यांना लागु होत असा एक ओळीचा खुलासा देवुन दोषाचे खंडण करण्यासाठी कोणताही सबळ कागदपत्र सादर केला नाही. 1124 मंजूर पदावर वेतनावर दैनिक वेतनावर काम करण्याऱ्या कर्मचाऱ्यांना कायम करतांना कर्मचारी समितीने अहवाल पाहिला असतां शासन निर्णय 2003 जोडपत्र 1 मध्ये मजूर व सफाई कामगारासह, दाया, माळी, सुरक्षा विभाग, विद्युत विभाग, हेल्पर, क्लीनर,

हमाल, इत्यादी संवर्गातील पदे मंजूर झाल्याचे आढळून येते. निवड समितीच्या अहवालावरून जवळ जवळ 100% कर्मचाऱ्यांना मजूर म्हणून नियुक्त्या दिल्याचे दिसून येतो म्हणून चौकशी अधिकारी यांनी आरोप सिध्द होते म्हणुन दिलेला आहे.

दोषारोप क्रमांक 7 :- निवड समिती अहवालात कर्मचारी ज्या विभागात पगार घेतात, त्या विभागाचे पगारपत्रके तपासून खात्री करुन घेण्यात आल्याचे नमूद केले. वास्तविक पाहता, लेखा विभागाचे अहवालानुसार बहुतांश कर्मचाऱ्यांनी प्रथम नियुक्ती तारखेस वेतन घेतले नसल्याचे निदर्शनास आले, त्यामुळे कोणतीही तपासणी न करता चुकीची माहिती देवून निवड समितीची दिशाभूल केली. असा दोषारोप आहे.

बहुतांश कर्मचाऱ्यांनी प्रथम नियुक्ती तारखेस काम केल्याचे दर्शविण्यात आले होते. तत्कालिन उपआयुक्त (त) श्री.शिंदे यांचीही नियुक्ती करण्यात आली होती. श्री.वाळुजकर आणि श्री.हिवराळे लिपीक यांचे आदेश काढुन नियुक्ती करण्यात आली त्यांनी या कामी कोणताही सहभाग नव्हता असे सांगीतले. दोषारोपासंदर्भा कोणताही सबळ पुरावा जोडला नाही. सबब या दोषामध्ये लेखा विभागाचा अहवाल दोषारोप सिध्द करण्यासाठी आवश्यक असतानां तो संचिकेमध्ये आढळुन आला नाही.त्यामुळे सत्य परिस्थिती पडताळुन पाहता आली नाही म्हणुन दोषरोप सिध्द होत नाही म्हणुन अभिप्राय नोंदविलेला आहे.

दोषारोप क्रमांक 8 :- उद्यान विभागाचे जेष्ठता यादीतील अ.क्र.2 वरील श्रीमती लिला अनिल ब्रम्हणे असे नांव असतांना आदेश देतांना श्रीमती चंद्रकला अमरसिंग ब्रम्हणे या नावाने आदेश दिले. उप आयुक्त, आयुक्त यांचे निदर्शनास ही बाब न आणून देता तसेच निवड समितीसमोर सादर करुन बनावट उमेदवारास नियुक्ती आदेश दिले.

1124 पदे भरतांना ते प्रक्रीयेत सहभागी नसल्याने चंद्रकला अमरसिंग ब्रम्हणे यांची नियुक्ती देणेसाठी नांवात बदलाची माहिती आयुक्त,उपआयुक्त यांचे निर्दशनास आणुन देण्याचा प्रश्न नाही असे साक्षीत नमुद केले आहे. चौकशी अंती चौकशी अधिकारी यांनी हा आरोप सिध्द होतो म्हणुन असा अहवाल चौकशी अधिकारी यांनी दिलेला आहे.

दोषारोप क्रमांक 9 :- साफसफाई विभागाच्या जेष्ठता यादीतील श्री सिध्दार्थ भिमराव दाभाडे, यादी क्र.266 हा कर्मचारी 1997 मध्ये लाड समितीच्या शिफारशीनुसार नियुक्ती देण्यात आली. 1998 मध्ये याच नावाने दुसऱ्या व्यक्तीस नियुक्ती देण्यात आली.

खुलासा केला आहे की, सन 1997 मध्ये श्री सिध्दार्थ भिमराव दाभाडे यांची नियुक्ती लाड समितीच्या शिफारसीनुसार झाल्यानंतर 1998 मध्ये याच नावाने दुसऱ्या व्यक्तीस नियुक्ती दिली नाही. त्या वेळेस त्यांचेकडे नियुक्ती देण्याचे काम नव्हते, ते काम तत्कालीन लिपीक श्री एम.बी.खरे यांचेकडे होते. उपलब्ध कागदपत्रावरून असे दिसुन येते की, मा.उच्च न्यायालयाचे यादी व्यतिरिक्त जी दुसरी यादी होती त्या यादीवर 266 अ.क्र.वर सिध्दार्थ दाभाडे असे नांव नमुद आहे. उपलब्ध संचिकेच्या कागदपत्रावरून सिध्दार्थ दाभाडे यांना अनुकंपा धर्तीवर सन 1997 पासून नियमित नेमणुक दिली आहे. परंतु सिध्दार्थ दाभाडे यांची संचिकेत

नोटशिट क्रमांक 3 वर नियमित नेमणुक देण्यापुर्वी विभाग 2 मध्ये मजूर म्हणुन नियुक्ती असा उल्लेख आहे. यावरून 1997 पुर्वी रोजंदारी काम करीत होते असा अर्थ निघतो व हेच नांव उच्च न्यायालयाच्या यादी व्यतिरिक्त असलेल्या जेष्ठता यादी अनुक्रमांक 66 वर आहे. परंतु सिध्दार्थ दाभाडे सन 1997 पासून नियमित नेमणुक मिळाल्यामुळे त्यांचे जेष्ठता सूचीत नाव राहिले व त्याच नावांचा गैरफायदा घेऊन सुनिल किसनराव दाभाडे यांना देणेसाठी अपचारी कर्मचारी मदत केल्याने 18.05.2004 संचिकेवरील टिप्पणीवरून दिसुन येते. या टिपणीमध्ये अपचारी यांनी परिच्छेद 1 मध्ये चुकीची नोट म्हणजे न्यायालयाच्या नांवात बदल करावा म्हणून दिनांक 22.03.2004 रोजी आदेश दिला असे म्हणटले आहे. चुकीचे आहे मा.न्यायालयाने असे आदेश दिलेले नाही. असे संचिकेतील न्यायालयाच्या निर्णयावरून दिसुन येते. श्री.सुनिल किसनराव दाभाडे यांचे नांवात बदल बाबतीतची संपूर्ण संचिका सादर करण्यात अपचारी कर्मचारी यांनीच पुढाकार घेऊन जेष्ठता यादीतील अ.क्रमांक 266 वरील मुळ उमेदवार सिध्दार्थ भिमराव दाभाडे या नावाचा गैर फायदा घेऊन सुनिल किसनराव दाभाडे यांना हेतुपूरस्कर दिला. सुनिल किसनराव दाभाडे यांचे नांव बदलसाठी न्यायालयाचे निर्णयाचा चुकीचा अर्थ लावुन महानगरपालिकेच्या प्रशासनाची दिशाभुल केली हा आरोप सिध्द होतो. 9 दोषारोप होते. दोषारोप क्रमांक 10 होत नसल्याचा निष्कर्ष काढलेला आहे.

यांचे संदर्भात दुसरी एक खाते चौकशी होती. त्याच्यामध्ये खातेआरोप सिध्द झालेला आहे. सिध्दार्थ भिमराव दाभाडे, अशोक भानुदास जाधव, कचरू नाथा खरात, दशरथ कचरू जोंधळे, यांची मुळ नियुक्ती व परिविक्षाधिन कालावधी खुला करण्याचे आदेश व सेवापटीत पदनाम बदल केल्याबद्दल हा दोषारोप होता. अपचारी कर्मचाऱ्यांची 16.8.10 च्या बचावाच्या निवेदनाथ सिध्दार्थ भिमराव दाभाडे कचरू नाथा खरात, दशरथ कचरू जोंधळे, प्रकरणात सेवा पुस्तक तयार करतांना किंवा परिविक्षाधिन कालावधी खुला करतांना सदर कर्मचाऱ्यांचे पदनाम शिपाई म्हणुन नोंदविले आहे व परिविक्षाधिन कालावधीत शिपाई पदनाम लिहिले आहे. सदर काम प्रत्यक्ष काम करीत असल्यामुळे व तसेच अनावधनाने घडलेले आहे. शिस्तभंग प्राधिकारी यांचे वतीने सादरकर्ता अधिकारी यांचे लेखी संक्षिप्त टिप्पणी लेंखी टाचनावर अपचारी कर्मचारी यांनी सादर केलेल्या निवेदनावरती सदरील दोषारोप स्पष्टपणे मान्य करतांना नमुद केले आहे. सिध्दार्थ भिमराव दाभाडे व इतर तीन कर्मचारी यांची सेवा पुस्तक तयार करत असतांना परिक्षावधीन कालावधी खुला करत असतांना सदरील कर्मचारी शिपाई पदावर कार्यरत असल्याने त्याचे अनावधानाने मजूर ऐवजी शिपाई लिहिले गेले. हि चुक जाणुन बजून केलेली नाही. सदरील सर्व बाबी लक्षात घेता साक्षीदारांच्या साक्षी आणि उपलब्ध पुरावे सदरील दोषारोप पुर्णपणे व ठामपणे सिध्द होतो. हे नमुद केले आहे.

मा.सभापती :मा.न्यायालयाच्या निर्णयानुसार अपिलींग ऑथोरिटीकडे अपिल करा म्हणुन सांगीतलेले आहे. जे दोषी म्हणुन आढळले त्यांनी अपिल केले.

स्थायी समिती अपिलींग ऑथोरिटी आहे प्रशासनाने आपले म्हणने बैठक सुरू होण्यापुर्वी माहिती द्यायला पाहिजे.

आस्थापना अधिकारी-1 :प्रशासनाचे बैठकीत दोषारोपाबाबत अभिकथन करीत आहे.

मा.सभापती :प्रशासनाने याबाबततची प्रशासनाची माहिती सभापतीकडे देणे आवश्यक आहे.

आस्थापना अधिकारी-1 :यापुढे लेखीस्वरूपात माहिती/टिपणी सादर करण्यात येईल. आता अभिकथन करीत आहे. संक्षिप्त टिपणी सादर करण्यात येईल. पहिल्या बैठकीत निर्णय झाला होता की, 8 प्रकरणाचा एकदाच निर्णय देण्यात येणार. 8 प्रकरणांचा पुर्ण माहिती देण्यात येईल किंवा प्रत्येक वेळेस प्रत्येक प्रकरणाची माहिती देण्यात येईल.

मा.सभापती :मा.न्यायालयाने 94-95 ला जी यादी अंतिम केली आहे दिशाभुल म्हणजे काय केलेली आहे.

आस्थापना अधिकारी-1 :चौकशी अधिकारी यांनी अहवाल दिलेला आहे.

मा.सभापती :असे कोणते प्रकरण जे की, दिशाभुल केली म्हणुन आढळुन आली.

आस्थापना अधिकारी-1 :शिवाजी खोतकर, अनिल जाधव, रविंद्र कांबळे, मिनाबाई रणधीर, सुरेश गरूड या कर्मचाऱ्यांसदर्भात दिलेले आहे. संक्षिप्त टिपणी पुराव्यासह दिलेले आहे.

मा.सभापती :1994-95 ची यादी मा.न्यायालयात सादर केली आणि मा.न्यायालयाची मान्यता झाली. त्यावेळेस त्या विभागात. हे व्यक्ती होते तिथे कार्यरत होते का?

आस्थापना अधिकारी-1 :नावाच्या पुराव्यासह टिपणी आपल्याकडे पाठविण्यात येणार आहे.

मा.सभापती :1994-95 च्या वेळेस कर्मचारी कार्यरत होते का? याबाबतची माहिती कोण देणार.

आस्थापना अधिकारी-1 :चौकशी अधिकारी यांनी दिलेले आहे. त्यावेळेस त्यांनी टिपणी तपासल्या संचिका आहे.

मा.सभापती :आरोप लावत असतांना त्या वेळेस तिथे कार्यरत होते का?

आस्थापना अधिकारी-1 :प्रशासनातर्फे आठही जणांबद्दल जे दोषारोप लावण्यात आलेले आहे आणि त्यांच्या कागदपत्रांच्या छायांकित प्रतीसह अहवाल आपल्याकडे देण्यात येईल.

मा.सभापती :दोषारोप क्रमांक 2 राजपत्राच्या आधारे नांवे बदलण्यात आले. प्रशासनाच्या म्हणण्यानुसार 1124 ची यादी करत असतांना कमिटीने सर्व प्रकरणांची नांव,जात,सह सर्वबाबींची छाननी केली.

आस्थापना अधिकारी-1 :यादी अंतिम झाल्यानंतर नावांत बदल झालेला आहे.

मा.सभापती :हे करत असतांना कुठली मंजूरी घेतली होती का?

आस्थापना अधिकारी-1 :याबाबतची संचिका आहे. कागदपत्र आपल्यासमोर येतीलच.

मा.सभापती :महाराष्ट्र शासनाचे राजपत्राचे आधारे नावात बदल करणे याबाबत कुणी मंजूरी दिली होती ?

आस्थापना अधिकारी-1 :मा.आयुक्तांची मंजूरी घेणे आवश्यक आहे. परंतु उपआयुक्त लेव्हलवर मान्यता घेऊन नावांत बदल केला आहे.

मा.सभापती :उपआयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे म्हणजे उपआयुक्त यामध्ये सहभागी आहेत.

आस्थापना अधिकारी-1 :त्यांनी मान्यता दिलेली आहे.

**मा.सभापती** :सदरील आरोप उपआयुक्त यांचेवर लावण्यात आले.

**आस्थापना अधिकारी-1** :त्यांचा चौकशी अहवाल माझ्याकडे नाही.

**मा.सभापती** :उपआयुक्तांवर आरोप लावण्यात आले होते.

**आस्थापना अधिकारी-1** :नेमका आरोप हा आहे का? हे पाहुन सांगण्यात येईल.

**मा.सभापती** :उपआयुक्तांनी यास मंजूरी दिलेली आहे म्हणजे त्यांचेवरही हे आरोप लावण्यात आले. उपआयुक्त यांना दोषी ठरविण्यात आले परंतु त्यांचे स्थायी समितीमध्ये अपिल आलेले नाही. दोषी ठरले आहे कि नाही.

**आस्थापना अधिकारी-1** :नाही.

**मा.सभापती** :आरोप त्यांचेवर लावण्यात आला होता का? नव्हता.

**आस्थापना अधिकारी-1** :सदरील आरोप त्यांचेवर लावण्यात आलेला आहे का? हे पाहुन सांगण्यात येईल.

**मा.सभापती** :मग त्यांना निर्दोष सोडलेले आहे का?

**आस्थापना अधिकारी-1** :या आठ लोकांमध्ये त्यांचा नावाचा उल्लेख नाही.

**मा.सभापती** :उपआयुक्तांवर आरोप लावण्यात आला होता कि नाही हे माहिती घेऊन सांगण्यात यावे. ते निर्दोष असतील आणि हे निर्दोष असे काही आहे का माहिती देण्यात यावी.

दोषारोप 3 मध्येही उपआयुक्त होते का? 1124 झाल्यानंतरचा विषय आहे. नांव बदलण्याबाबतीत उपआयुक्तांनी मंजूरी दिली होती का? ते बघावे लागेल.

**आस्थापना अधिकारी-1** :होय.

**मा.सभापती** :दोषारोप क्रमांक 4 नांव बदलणे. 1124 झाल्यानंतरची प्रकरणे आहेत.

**आस्थापना अधिकारी-1** :1124 नंतरची प्रकरणे आहेत. नांवे बदलली. आदेश दिल्यानंतर सांगीतले की, माझे हे नांव नाही. वास्तविक ही यादी 1994 रोजी अंतिम झाली. Suggestion Objection घेऊन त्यांचे नांवामध्ये काही दुरूस्ती आहे का? ही प्रक्रीया त्यावेळेस झालेली आहे आणि यादी अंतिम झालेली आहे.

**मा.सभापती** :श्री.बावस्कर हे या प्रक्रीयेमध्ये होते,

**आस्थापना अधिकारी-1** :संचिका त्यांनीच सादर केलेल्या आहेत.

**मा.सभापती** :दोषारोप क्रमांक 5 आरक्षण, शैक्षणिक अर्हता विभागास व पदास मान्यता नसतांना पदे भरणे. संदर्भांत आहे. ज्यांना मान्यता नव्हती अशी पदे भरलेली आहेत.

**आस्थापना अधिकारी-1** :संशोधन केंद्र, महापौर निवासस्थान, पुराणवस्तु संग्रहालय, जलतरण विभाग, जायकवाडी, बांधकाम, वाचनालय, नोंदणी विभाग, स्लम

**मा.सभापती** :निवड समितीचा अहवाल पान नंबर 2 वर आहे. विभागाचा उल्लेख केलेला आहे. दोषारोप क्रमांक 6 च्या वेळेस त्याच विभागामध्ये या पदावर कार्यरत होते का?

**आस्थापना अधिकारी-1** :कार्यरत होते.

**मा.सभापती** :या सर्व संचिका निवड समितीच्या माध्यमातुन गेलेल्या आहेत.

**आस्थापना अधिकारी-1** :निवड समितीच्या माध्यमातुन गेलेल्या आहेत.

**मा.सभापती** :निवड समितीने संचिकेंची तपासणी केलेली असेल.

**आस्थापना अधिकारी-1** :होय.

**मा.सभापती** :चार जणांच्या निवड समितीच्या सदस्यांनी तपासणी केल्यानंतर अंतिम करण्यात आले होते.

**आस्थापना अधिकारी-1** :होय.

**मा.सभापती** :दोषारोप क्रमांक 9, साफसफाई विभागाच्या जेष्ठता यादीतील श्री.सिध्दार्थ भिमराव दाभाडे, यादी क्र.266 हा कर्मचारी 1197मध्ये लाड समितीच्या शिफारशीनुसार नियुक्ती देण्यात आली. 1998मध्ये याच नावाने दुसऱ्या व्यक्त्तीस नियुक्ती देण्यात आली.
266 क्रमांकावर कोण होते.

**आस्थापना अधिकारी-1** :सिध्दार्थ भिमराव दाभाडे

**मा.सभापती** :नामदेव म्हस्के आहे. प्रशासकीय माहिती माझ्याकडे आहे. ही यादी कोणी तयार केलेली आहे. 1995 मध्ये 266 क्रमांकावर नामदेव म्हस्के आहे. 1996 मध्ये सिध्दार्थ भिमराव दाभाडे आहे.

**आस्थापना अधिकारी-1** :मुळ मा.न्यायालयाची यादी आहे ती अंतिम केलेली आहे. त्यावरील नांव सांगीतलेले आहे. चौकशीमध्ये तेच आलेले आहे.

**मा.सभापती** :266 वर एक नांव आहे. ही कुणाची सही आहे.
(उपआयुक्त (प्र) तथा नगर सचिव संचिका पहाणी करतात)

**नगर सचिव** :सहाय्यक आयुक्तांची सही आहे आणि पुढे 1996 मध्ये 266 वर नांव आहे एका नंबर वर दोन नांवे आलेले आहे.

**आस्थापना अधिकारी-1** :याबाबत मला माहित नाही.

**मा.सभापती** :266 वर दुसरे नांव आले आणि नंतर आरोप असा आला की, या दोन व्यक्तींचे नांवे भरण्यात आले. नांवे भरत असतांनाची संचिका आहे का?

**आस्थापना अधिकारी-1** :संचिका आहे.

**मा.सभापती** : दाभाडे यांची संचिका दाखविण्यात यावी.

**आस्थापना अधिकारी-1** :टिपणीसह संचिका आपणांकडे दाखविण्यात येईल.

**मा.सभापती** :सिध्दार्थ भिमराव दाभाडे यांची संचिका कुणी पुटअप केली त्यावेळेस डयुटीवर कोण होते. कुणाच्या हाताने ती पुटअप झालेली आहे.

**आस्थापना अधिकारी** :सिध्दार्थ भिमराव दाभाडे हे नांव बदलण्याची संपूर्ण संचिका सादर करण्यात अपचारी कर्मचारी यांनीच पुढाकार घेतल्याचे चौकशीमध्ये नमुद केलेले आहे.

**मा.सभापती** :सदरची संचिका आणुन दाखविण्यात यावी. कुणी पुटअप केलेली आहे. कोणत्या लिपीकाने पुटअप केलेली आहे.

**श्री.समीर राजुरकर** :विधी सल्लागार यांचा सल्ला घेण्यात यावा की, चौकशी समितीच्या सदस्यांना स्थायी समितीच्या ट्रीब्युनलमध्ये सुनावणी संदर्भात बोलविता येते का?

**विधी सल्लागार** : सदस्यांना बोलावता येत नाही. त्यांनी जी चौकशी केलेली आहे, ती स्वतंत्ररित्या केलेली आहे. चौकशीच्या अनुषंगाने त्यांनी निर्णय दिलेला आहे. अपिलेट ॲथॉरिटी यांना जो निर्णय घ्यायचा तो घ्यायचा.

**निर्णय :**

आजच्या सभेपुढे असलेल्या अपिला संदर्भात अपिलकर्ता श्री.एम.एन.बावस्कर, व प्रशासनाचे म्हणणे ऐकुन घेतले असून या अपीलावरील निर्णय राखुन ठेवण्यात येत आहे. सर्व अपिलांची सुनावणी झाल्यानंतर निर्णय घोषीत करण्यात येईल.

**विषय क्र. 36 :**

मा.उच्च न्यायालय मुंबईचे औरंगाबाद खंडपीठाने याचिका क्र.6996/2011 दिनांक 10/07/2012 रोजी दिलेल्या निर्णयानुसार श्री.अनिल मधुकरराव वाळुजकर, कनिष्ठ लिपीक (सध्या

सेवेतून काढून टाकले आहे.) मनपा, औरंगाबाद यांनी कार्यालयीन आदेश क्रमांक मनपा/आस्था-1/2011/1283, दिनांक 07 सप्टेबंर 2011 अन्वये त्यांना महानगरपालिका सेवेतून काढून टाकण्याच्या आदेशाविरूध्द स्थायी समितीकडे सादर केलेल्या अपिलावर विचार विनिमय करून निर्णय घेणे.

श्री.अनिल वाळुजकर :मी महानगरपालिकेत कनिष्ठ लिपीक म्हणून आस्थापना-2 विभागात कार्यरत असतांना 1124 कर्मचारी भरती प्रकरणांत झालेल्या अनियमीततेबाबत माझे विरुध्द खातेनिहाय चौकशी प्रस्तावित करण्यात आली. माझेवर ठेवण्यात आलेल्या एकूण (07) दोषारोपापैकी एकूण (03) दोषारोप सिध्द झालेले मुळे मला सेवेतुन कमी करण्यात आले. माझेविरुध्द ठेवण्यात आलेल्या दोषारोपाचे अभिकथन मी खालील प्रमाणे दोषारोपनिहाय करीत आहे कृपया सदरील अभिकथनाचा विचार करुन मला न्यायदान करण्यात यावे,ही विनंती.

<u>दोषारोप क्रमांक 1 :- मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाचा विपरीत अर्थ लावून कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीस मदत करुन मा.उच्च न्यायालय व मनपा प्रशासनाची दिशाभूल केली.</u>

सदरील दोषारोपाचे अवलोकन केले असता, मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाचा विपरीत अर्थ लावून कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीस मदत करुन मा.उच्च न्यायालय व मनपा प्रशासनाची दिशाभूल केली असा दोषारोप असल्याचे दिसून येतो.

प्रस्तुत प्रकरणांत मा.सादरकर्ता अधिकारी यांनी दिनांक 15/6/2011 रोजी दिलेल्या टाचणात, मा.उच्च न्यायालयाचे निर्देश पाहता त्यातील निर्णयाचा चूकीचा अर्थ लावून श्रीमती चंद्रकला अमरसिंग ब्रम्हणे यांना चूकीची माहिती सादर करुन नेमणूकीसाठी मदत केली असा युक्तीवाद करुन दोषारोप सिध्द होतात असे निष्कर्ष काढलेले आहेत. तसेच पुढे, श्रीमती लिलाबाई अनिल ब्रम्हणे व श्रीमती चंद्रकला अमरसिंग ब्रम्हणे ही एकच व्यक्ती आहे असे प्रथमदर्शनी महिलेचे नांव व पती/पिता यांच्या नांवावरुन दिसून येत नाही, नांव कां बदलले, नांव बदलास मा.न्यायालयाने काय सूचना होत्या याचा काहीही उहापोह खुलाशात नाही असे त्यांचे म्हणणे आहे. यावरुन सत्य परिस्थिती लपविण्याचा प्रयत्न अपचारी करीत असल्याने दोषारोप सिध्द होतो असा निष्कर्ष काढलेला आहे.

सदरील प्रकरणांत मा.उच्च न्यायालय व अर्जदार यांनी वेळोवेळी अर्ज सादर केल्यामुळे टिपणी व तसे प्रकरण निवड समितीसमोर सादर करण्यात आले होते. त्यानुसारच वरिष्ठांकडे प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता व त्यानुसार श्रीमती चंद्रकला अमरसिंग ब्रम्हणे यांचे नांवात दुरुस्ती करण्यात आलेली आहे. त्यात मा.उच्च न्यायालयाचे आदेशाचा विपरीत अर्थ लावण्याचा व मा.उच्च न्यायालय व महानगरपालिकेची दिशाभूल करण्याचा कोणताही प्रश्नच उद्‌भवत नाही. उलटपक्षी मा.उच्च न्यायालयाचे आदेशानुसारच प्रस्ताव सादर केला होता. मा.महोदयांचे निदर्शनास एक बाब आणून देऊ इच्छीतो की, मी लिपीक संवर्गीय वर्ग-3 चा कनिष्ठ कर्मचारी असून मला नांवात दुरुस्ती करणेबाबत किंवा कोणासही पदस्थापना देणेबाबतचे कोणतेही अधिकार नाहीत. केवळ प्रस्ताव सादर करणेचे कर्तव्य माझे कार्यकक्षेत येत असून त्यानुसारच

प्रस्ताव सादर केलेला आहे. माझे प्रस्तावात चुकीचे किंवा मा.उच्च न्यायालयाचे विपरीत असा अर्थ निघत असल्याचे वरिष्ठ अधिकाऱ्यांचे निदर्शनास आले असते तर त्यांनी त्याच वेळी मला बोलावून तशी दुरुस्ती करावयास लावली असती. आणखी एक बाब मी मा.महोदयांचे निदर्शनास आणून देऊ इच्छीतो की, जर श्रीमती लिलाबाई अनिल ब्रम्हणे व श्रीमती चंद्रकला अमरसिंग ब्रम्हणे या दोन व्यक्ती असत्या तर श्रीमती लिलाबाई अनिल ब्रम्हणे यांनी याबाबत आक्षेप नोंदविला असता. परंतू तशी कोणतीही परिस्थिती निर्माण झालेली नाही व तशी श्रीमती लिलाबाई यांचे नांवाची कोणीही व्यक्ती सदरील चौकशीत समोर आलेली नाही. 1124 मंजूर पदावर दैनिक वेतनावरील कामगारांना कायम करण्याचा कर्मचारी निवड समितीचा अहवालाची अहवालातील पृष्ट क्रमांक 2 वर, न्यायालय यादीतील नावामध्ये अथवा जन्मतारखेमध्ये काही प्रमाणात टंकलेखनाच्या चुका आढळल्या, त्या चुका कर्मचाऱ्यांनी सादर केलेल्या कागदपत्रावरुन पडताळणी करुन दुरुस्त करण्यात आल्या. सदरील कागदपत्रे साक्षांकीत करुन घेण्यात आली असे निवड समितीच्या अहवालात नमूद आहे.

यावरुन निवड समितीने कर्मचाऱ्यांनी सादर केलेल्या कागदपत्राची पडताळणी करुनच नांवात दुरुस्त्या केल्या होत्या. त्यामुळे महानगरपालिकेची दिशाभूल करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. त्यामुळे सदरील दोषारोप किती मोघम स्वरुपाचा आहे हेही सिध्द होईल.

मा.उच्च न्यायालयाचे आदेशाचा नेमका कोणता विपरीत अर्थ मी काढला? तसेच सदरील ज्या संचिकेवरुन दोषारोप सिध्द होतो ती संचिका दोषारोपपत्राचे जोडपत्र-4 मध्ये कां समाविष्ट करण्यात आलेली नाही? जोडपत्र-4 मध्ये नमूद नसलेली कागदपत्रे कोणाकडून व कधी मा.सादरकर्ता अधिकारी यांनी उपलब्ध करुन घेतली? सदरील कागदपत्रे अपचारी यांना देणे अनिवार्य नव्हते कां? याबाबींचा खुलासा होणेही आवश्यक आहे.

मा.चौकशी अधिकारी यांनी उपरोक्त प्रमाणे संचिकेबाबत कोणत्याही बाबी स्पष्ट केलेल्या नसल्याने केवळ सादरकर्ता अधिकारी यांनी दोषारोप सिध्द होतो असे निष्कर्ष काढलेले असल्याने त्यांचे टाचणाचा आधार घेत दोषारोप सिध्द होतात असे मोघम निष्कर्ष काढलेले आहेत. ते कोणत्याही पुराव्यावर आधारीत नाहीत. त्यामुळे सदरील बाबीस कोणतीही विधीग्राहयता प्राप्त होत नाही. करिता सदरील दोषारोपातून मला मुक्त करण्यात यावे,ही विनंती.

<u>दोषारोप क्रमांक 2 :- निवड समितीसमोर प्रकरण सादर करतांना प्रकरणाची पूर्णतः जाणीव असून सुध्दा इत्यंभूत माहिती जाणुनबुजून सादर न करणे.आरक्षण,शैक्षणिकअर्हता,विभागास व पदास मान्यता नसतांना पदे भरणे.</u>

निवड समितीसमोर प्रकरण सादर करतांना प्रकरणाची पुर्णतः जाणीव असून सुध्दा इत्तंभूत माहिती जाणुनबुजून सादर न करणे, आरक्षण, शैक्षणीक अर्हता विभागास सादर न करणे अशा आशयाचा दोषारोप आहे. मा.साहेबांच्या मी निदर्शनास आणून देऊ इच्छीतो की, दैनिक वेतन कर्मचाऱ्यांचे नियुक्तीसाठी खालील प्रमाणे निवड समिती गठीत करण्यात आलेली होती त्यामध्ये खालील प्रमाणे अधिकारी होते.

**1) आयुक्त - अध्यक्ष,**
**2) उप आयुक्त (प्र) - सदस्य,**
**3) उप आयुक्त (म) - सदस्य,**
**4) मुख्य लेखा परिक्षक - सदस्य**

**सदरील निवड समितीचे अवलोकन केले असता, निवड समितीमध्ये माझा कोणताही सहभाग नव्हता हे स्पष्ट होईल. निवड समितीतील एक सदस्य मा.उप आयुक्त (प्र) श्री कांबळेसाहेब यांचेविरुध्दही सदर दोषारोप लावण्यात आलेला आहे. सदरील दोषारोपाबाबत श्री कांबळेसाहेब यांचे निवेदनाचे अवलोकन केले असता, सदरील निवेदनात त्यांनी त्यांचे अधिनस्त आस्थापना विभागातील कर्मचाऱ्यांनी निवड समितीसमोर प्रकरणे सादर करतांना जाणीव पुर्वक कोणतीही माहिती लपवून ठेवली होती, आरक्षण, शैक्षणीक अर्हता याबाबी दर्शविण्यात आल्या नव्हत्या असे निवेदन केलेले नाही. तसेच निवड समितीनी सदरील पदास मान्यता दिलेली असल्याचेही कबूल केले आहे. त्यामुळे आस्थापना विभागातील कर्मचाऱ्यांनी सादर केलेली प्रकरणे निवड समितीसमोर योग्यरित्याच सादर करण्यात आलेल्या असल्यानेच निवड समितीने सदरील पदास मान्यता दिलेली बाब स्पष्ट होते. उलटपक्षी सादरकर्ता अधिकारी यांनी श्री कांबळेसाहेब यांचे विरुध्द ठेवण्यात आलेल्या सदरचा दोषारोप क्रमांक 5 बाबत युक्तीवाद करतांना, हा दोषारोप मोघम वाटतो कारण शासनाने किती पदास मंजूरी केली होती व किती पदे प्रत्यक्षात भरली, पदे भरण्यास अपचारी हे कसे जबाबदार आहेत त्यास कोणता पुरावा उपलब्ध आहेत, याबाबतची अधिक माहिती संचिकेत उपलब्ध नाही किंवा अधिक पदे भरण्याबाबतची घटना किंवा एखादा कागदोपत्री पुरावा संचिकेत उपलब्ध नसल्याने दोषारोप सिध्द होत नाही असा युक्तीवाद केला आहे. सदरील दोषारोप माझे विरुध्दही लावण्यात आलेला असून माझे विरुध्द मात्र दोषारोप सिध्द होतो असा युक्तीवाद नोंदविला आहे. जर शासनाने किती पदास मंजूरी दिली होती व किती पदे प्रत्यक्षात भरली याबाबतचा मा.सादरकर्ता अधिकारी व मा.चौकशी अधिकारी यांचेकडे कोणताही पुरावा उपलब्ध नव्हता तर माझे विरुध्दचा दोषारोप कोणत्या कागदोपत्री पुराव्यावरुन सिध्द होतो? या प्रश्न निश्चीतच पडतो. यावरुन माझेविरुध्द, पदास मान्यता नसतांना पदे भरली असा दोषारोप सिध्द कसा होऊ शकतो. सदरील निवड समितीतील अहवालाचे कृपया अवलोकन व्हावे. त्यातील निवड समितीची कांही अवलोकने मी खालील प्रमाणे सादर करीत आहे :-**

**अ) सदरील निवड समितीचे अहवालातील पृष्ट क्रमांक 1 वर, पदांना आरक्षण बिंदू नामावली लागू असल्याने बिंदू नामावली नोंदवहीनुसारची अनुशेष असलेली पदे व नविन मान्य पदे व त्या त्या संवर्गातील एकूण संख्येवरील आरक्षण तपासून घेण्याचे ठरले. त्यानुसार येणाऱ्या आरक्षणानुसार उपरोक्त पदे दुसऱ्या टप्प्यात कायम करण्याचे समितीने ठरविले होते.**

**ब) पृष्ट क्रमांक 2 वर, न्यायालय यादीतील नांवामध्ये अथवा जन्मतारखेमध्ये काही प्रमाणात टंकलेखनाच्या चुका आढळल्या, त्या चुका दुरुस्त करण्यात आल्या असे नमूद आहे.**

क) पृष्ट क्रमांक 2 वर, शासनाने आदेशात नमूद केल्याप्रमाणे शैक्षणीक अर्हता धारण न करणाऱ्या कर्मचाऱ्यांना शैक्षणिक अर्हतेत शिथीलता देण्यात यावी व ज्या कर्मचाऱ्यांचे उच्चतम वयोमान पार झालेले आहे, अशा कर्मचाऱ्यांना उच्चतम वयोमानात शिथीलता देण्यात आली असे ठरले असे नमूद आहे.

निवड समितीसमोर प्रकरण सादर करतांना प्रकरणाची पूर्णतः जाणीव असूनसुध्दा इत्यंभूत माहिती जाणुनबुजून सादर न करणे, आरक्षण, शैक्षणिक अर्हता विभागास व पदास मान्यता नसतांना पदे भरणे असा दोषारोप आहे.

निवड समितीचे अहवालातील उपरोक्त प्रमाणे अ, ब व क मध्ये नमूद केलेल्या बाबीनुसार, आरक्षण, शैक्षणीक अर्हता व विभागास व पदास मान्यता असलेबाबतची बाब निवड समितीसमोर ठेवण्यात आली होती हया बाबी स्पष्ट होतील. त्यानुसार निवड समितीने मान्यता असलेल्या पदास बिंदू नामावलीनुसार आरक्षण, शैक्षणीक अर्हता धारण न करणाऱ्या कर्मचाऱ्यांना शैक्षणिक अर्हतेत शिथीलता देण्यात यावी, म्हणजेच आस्थापना विभागामार्फत जो प्रस्ताव सादर करण्यात आला होता त्यात आरक्षण, शैक्षणीक अर्हता, पदाची माहिती या बाबतची इत्यंभूत माहिती निवड समितीला सादर करण्यात आलेली होती हेच स्पष्ट होते.

करिता माझेविरुध्द ठेवण्यात आलेला दोषारोप निष्प्रभ ठरत असल्याने सदरील दोषारोपातून मला मुक्त करण्यात यावे,ही विनंती.

<u>दोषारोप क्रमांक 5 :- उद्यान विभागाचे जेष्ठता यादीतील अ.क्र.2 वरील श्रीमती लिलाबाई अनिल ब्रम्हणे असे नांव असतांना आदेश देतांना श्रीमती चंद्रकला अमरसिंग ब्रम्हणे या नावाने आदेश दिले. उप आयुक्त, आयुक्त यांचे निदर्शनास ही बाब न आणून देता तसेच निवड समितीसमोर सादर करुन बनावट उमेदवारास नियुक्ती आदेश दिले.</u>

मा.महोदय, सदरील दोषारोप हा माझे विरुध्द ठेवण्यात आलेल्या दोषारोप क्रमांक 1 चाच भाग आहे. सदरील दोषारोप क्रमांक 1 चे निवेदनात मी, श्रीमती चंद्रकला अमरसिंग ब्रम्हणे यांचे नांवात बदलाबाबत विस्तृत निवेदन सादर केले आहे. कृपया त्याचा विचार व्हावा.

सदरील दोषारोप सिध्द करतांना मा.चौकशी अधिकारी यांनी, जेष्ठता अ.क्र.2 वर श्रीमती लीलाबाई अनिल ब्रम्हणे असे नांव असतांना नियमीत नेमणूक आदेश श्रीमती चंद्रकला अमरसिंग ब्रम्हणे यांचे नावाने कसे काढले, मा.आयुक्त/उपायुक्त यांचे निदर्शनास आणून दिले नाही कर्तव्य नीट बजावले नाही त्यामुळे बनावट उमेदवारास चूकीचे आदेश दिल्या गेले या बाबी संचिकेतील उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून येत असल्याने दोषारोपास पृष्टी मिळते असा निष्कर्ष काढला आहे.

मा.महोदयांचे हे निदर्शनास आणून देऊ इच्छीतो की, मा.चौकशी अधिकारी यांनी संचिकेतील उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून येते असे स्पष्ट केले आहे. मा.महोदयांचे मी निदर्शनास आणून देऊ इच्छीतो की, मा.चौकशी अधिकारी यांनी संचिकेतील उपलब्ध कागदपत्रावरुन म्हणजे - नेमके कोणत्या संचिकेवरुन दोषारोप सिध्द होतो हे नमूद केलेले ाही. तसेच सदरील संचिका त्यांनी सदरील चौकशी प्रकरणांत हाताळली असेल

तर ती दोषारोपाचे जोडपत्र-4 मध्ये कां समाविष्ट करण्यात आलेली नाही. दोषारोप हे जोडपत्र-3 मध्ये नमूद केलेल्या सरकारी साक्षीदार यांचे साक्षीवरुन व जोडपत्र-4 मध्ये नमूद केलेल्या कागदपत्रावरुन सिध्द करावयाचे असतात. असे असतांना जोडपत्र-3 मध्ये कोणत्याही साक्षीदाराचे नाव समाविष्ट करण्यात आलेले नसून जोडपत्र-4 मध्ये नमूद केलेली कागदपत्रे दोषारोप सिध्द करण्यास पुरेशी नाहीत असे असतांना जोडपत्र-4 मध्ये नमूद केलेल्या कागदपत्रा व्यतिरिक्त कागदपत्रे मा.चौकशी अधिकारी यांनी कोठून उपलब्ध केली व कशी उपलब्ध केली याबाबत याप्रती अपचारी यांना देणे आवश्यक आहे. बनावट उमेदवारास नियुक्ती आदेश दिल्या गेले असा दोषारोप माझेविरुध्द ठेवण्यात आलेला आहे. मा.महोदयांचे निदर्शनास आणून देऊ इच्छीतो की, जर श्रीमती लिलाबाई अनिल ब्रम्हणे व श्रीमती चंद्रकला अमरसिंग ब्रम्हणे या दोन व्यक्ती असत्या तर श्रीमती लिलाबाई अनिल ब्रम्हणे यांनी याबाबत आक्षेप नोंदविला असता. परंतू तशी कोणतीही परिस्थिती निर्माण झालेली नाही व तशी श्रीमती लिलाबाई यांचे नांवाची कोणीही व्यक्ती सदरील चौकशीत समोर आलेली नाही व आजतागायत कोणीही श्रीमती लिलाबाई नांवाच्या व्यक्तीचा सदरील नांवातील बदल चुकीचा असल्याबाबत अर्ज प्राप्त झालेला नाही व त्यांचा अर्जही प्राप्त झालेला नाही. करीता माझे विरूध्द ठेवण्यात आलेला आरोप निष्प्रभ ठरत असल्याने सदरील दोषारोपातुन मला मुक्त करण्यात यावे. हि नम्र विनंती.

करिता विनंती की,

1. अर्जदार यांचा अपील अर्ज मंजूर करावा.

2. मा.आयुक्त,महानगरपालिका, औरंगाबाद यांचे आदेश क्र.मनपा/आस्था-1/2011/1283 दिनांक 7/9/2011 रद्यबातल करुन अर्जदार यांना कनिष्ठ लिपीक,महानगरपालिका, औरंगाबाद या पदावर दिनांक 7/9/2011 पासून पुर्वलक्षी प्रभावाने कामावर घेण्यात यावे, ही नम्र विनंती. आमचे मत मांडण्याची संधी दिल्याबद्दल मा.सभागृहाचे आभार मांडण्यात येते.

मा.सभापती :दोषारोप क्रमांक 1 श्रीमती चंद्रकला अमरसिंग ब्रम्हणे आणि मा.न्यायालयाच्या यादीत श्रीमती लिलाबाई अनिल ब्रम्हणे असे आहे. 1124 ची यादी समितीच्या माध्यमातुन/समोरून गेलेली आहे.

आस्थापना अधिकारी-1 : सन 1994-95 ला जी यादी झाली त्याच्या नंतर ही दुरूस्ती झाली.

मा.सभापती :सन 2004 ला भरती करतांना जी समिती नेमण्यत आली होती. त्या समितीने एक एक संचिकेची छाननी केली होती.

आस्थापना अधिकारी-1 :समितीने तपासणी केली आहे.

मा.सभापती :छाननी होऊनच प्रक्रीया पुर्ण झालेली आहे.

आस्थापना अधिकारी-1 :होय.

मा.सभापती :दोषारोप क्रमांक 2 तोच विषय आहे. इतर ठिकाणी,महापौर निवास व इतर तोच विषय आलेला आहे. दोषारोप क्रमांक 5 श्रीमती चंद्रकला अमरसिंग ब्रम्हणे यांचाच विषय आलेला आहे. तोच विषय आलेला आहे.

<u>निर्णय :</u>

आजच्या सभेपुढे असलेल्या अपिला संदर्भांत अपिलकर्ता श्री.अनिल वाळुजकर व प्रशासनाचे म्हणणे ऐकुन घेतले असून या अपीलावरील निर्णय राखुन ठेवण्यात येत आहे. सर्व अपिलांची सुनावणी झाल्यानंतर निर्णय घोषीत करण्यात येईल.

ऐनवेळचे विषय

विषय क्र. 37 :

कार्यकारी अभियंता, वार्ड ई व फ, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, बालाजीनगर येथील तानाजी चौक पुढील चौक ते रोपळेकर हॉस्पिटल रोड व दर्गा रोडला मिळणाऱ्या मुख्य रस्ते कॉँक्रीट रस्ते तयार करणे या कामाकरीता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसुची सन 2010-11 नुसार तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.4986280/- अंदाजपत्रकास मा.सर्वसाधारण सभा विषय क्र.619 दि.01/03/2012 अन्वये मान्यता प्राप्त झालेली आहे. त्यानुसार सदरील कामाकरीता निविदा मागविण्यात आली असता तुलनात्मकदृष्ट्या व सर्वात कमी दर मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा 17.00 टक्के जास्त असे आहे. सन 2010-2011 नुसार तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकाची दराची सन 2011-2012 च्या दरसुची नुसार तुलना केली असता सदरील दर हे 7.94 टक्के कमी आहे.

तरी सदरील काम मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 17.00 टक्के जास्त दराने करून घेण्याच्या मंजुरीचा प्रस्ताव व वाढीव रक्कम (Above Tender) मुळे पण मंजुरी देणेचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.सभापती : विषय क्रमांक 37 मंजूर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बालाजीनगर येथील तानाजी चौक पुढील चौक ते रोपळेकर हॉस्पिटल रोड व दर्गा रोडला मिळणाऱ्या मुख्य रस्ते कॉँक्रीट रस्ते तयार करणे या कामाकरीता प्राप्त झालेली तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 17.00 टक्के जास्त दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. 38 :

कार्यकारी अभियंता, वार्ड ई व फ, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, जयविश्वभारती कॉलनी आणि रविंद्रनगर येथील मुख्य रस्त्यांचे कॉँक्रीट रस्ते तयार करणे या कामाकरीता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसुची सन 2010-11 नुसार तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.4996323/- अंदाजपत्रकास मा.सर्वसाधारण सभा विषय क्र.619 दि.01/03/2012 अन्वये मान्यता प्राप्त झालेली आहे. त्यानुसार सदरील कामाकरीता निविदा मागविण्यात आली असता तुलनात्मकदृष्ट्या व सर्वात कमी दर मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा 17.00 टक्के जास्त असे आहे. सन 2010-2011 नुसार तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकाची दराची सन 2011-2012 च्या दरसुची नुसार तुलना केली असता सदरील दर हे 12.12 टक्के कमी आहे.

तरी सदरील काम मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 17.00 टक्के जास्त दराने करून घेण्याच्या मंजुरीचा प्रस्ताव व वाढीव रक्कम (Above Tender) मुळे पण मंजुरी देणेचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.सभापती : विषय क्रमांक 38 मंजूर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जयविश्वभारती कॉलनी आणि रविंद्रनगर येथील मुख्य रस्त्यांचे कॉँक्रीट रस्ते तयार करणे या कामाकरीता प्राप्त झालेली तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 17.00 टक्के जास्त दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. 39 :

मा.स्थायी समितीसमोर प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मोहल्ला औरंगपुरा येथील महानगरपालिकेच्या मालकीच्या अधिकारात असलेल्या पिया मार्केट मधील प.म. वरील दुकान क्र. (16)

भाडे तत्वावर देण्यात यावे म्हणुन अर्जदार श्री.उमेश छन्नुलाल मेघावाले यांनी विनंती केली आहे. सदर दुकानाचे क्षेत्र 7.2 चौ.मी. एवढे आहे. सदर दुकान यापूर्वी लिलावाने देण्यात आलेल्या व्यक्तीने ताब्यात घेतले नसल्याने सदर दुकान रिक्त आहे.

अर्जदाराची मागणी विचारात घेता सदर दुकानाकरीता या वर्षीचे सिध्द शिघ्र गणक दरा आधारे होणाऱ्या भाडे दराचे दीडपट याप्रमाणे रक्कम रू.1943/- (लागू सेवाकर 12.36% वेगळे) एवढे मासिक भाडे होत आहे. याशिवाय मालमत्ता कर, इतर कर तसेच सेवा शुल्क इत्यादीसह नेहमीच्या अटी/शर्ती लागू राहतील. याप्रमाणे भाडे निश्चिती करून सदर रक्कम भाडे तत्वावर देण्यास झालेल्या मान्यते संबंधाने प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

श्री.रेणुकादास वैद्य :विषय क्रमांक 39 बाबत माहिती हवी आहे. मनपाने किती दिवसांपासून दुकान भाडयाने दिलेले नाही.

मालमत्ता अधिकारी :यापुर्वी जाहिर लिलाव पध्दतीने दुकान 1020 रूपये भाडयाने देण्यात आले होते परंतु त्यांनी ती पुर्तता केली नसल्यामुळे सन 2009 पासून दुकान रिक्त आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :रेडी रेकनरने द्या म्हणुन सांगण्यात आले आहे. पाच पाच वर्ष दुकाना रिकाम्या राहतात अवास्तव भाडे आकारणी केली जाते तर दुकाना कोण भाडयाने घेतील. पहिल्या मजल्यावरील दुकान आहे. रेडी रेकनर रेट लावला जातो. 5 - 5 वर्ष दुकाने रिकाम्या राहतात. नियम दाखवुन दुकाना सडवायच्या का? नागरीकांना दिल्यास दुकाना वापरात येतील.

मा.सभापती :दुकानाचे हायस्ट भाडे काय आहे.

मालमत्ता अधिकारी :723 रूपये भाडे आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :जास्तीत जास्त भाडे त्या कॉम्पलेक्समध्ये असेल ते भाडे याल आकारण्यात यावे तसेच उर्वरित दुकाना जे काही आहे. जे कुणी मागणी करतील त्यांना हायरसाईडचे जे भाडे आहे त्या भाडयाने दुकाना देण्यात यावी.

श्री.समीर राजुरकर :रेडी रेकनरला अव्हाईड करून ॲथोरिटी निर्णय घेऊ शकते का? जो जास्तीचे भाडे देईल त्याला देण्यात यावे.

मालमत्ता अधिकारी :रेडी रेकनर रेफनन्स घेण्यात येतो बाजारभाव म्हणुन

श्री.समीर राजुरकर :100 दुकाना रिकाम्या आहेत त्या हया रेटने भाडयाने देवुन टाकण्यात यावे. कॉम्प्लेक्समध्ये जास्त रेट जो असेल त्या रेटनी भाडयाने देण्यात यावे.

मा.सभापती : मागील काळात स.श्री.राजू शिंदे, सभापती असतांना स.सदस्य श्री.रेणुकादास वैद्य व मी स्थायी समितीचे सदस्य होतो, त्यावेळी सभेत निर्णय झालेला आहे. ज्या दुकाना रिकाम्या आहेत, ज्यांची मागणी असेल त्यांना ती ताबडतोब देण्यांत यावी. विना टेंडर, दुकानाचे वर्षाचे भाडे जेवढे, नसता तेवढे निविदा प्रसिध्द करण्यासाठी लागतात. स.सदस्य श्री.रेणुकादास वैद्य यांनी सुचविल्याप्रमाणे 723 रूपये तेथील उच्च दर आहे. त्याच दराने दुकाना देण्यात याव्यात तसेच जे मागणी करतात, त्यांना ताबडतोब देण्यात याव्यात. 5-5 वर्षे दुकाना रिकाम्या राहत आहे. शटर रिकामे राहत आहे. त्यामुळे दुकाने भाड्याने देण्यात यावी.

श्री.रेणुकादास वैद्य :स.सदस्य श्री.मोहन मेघावाले यांचे वार्डातील सभागृह भाडयाने देणेबाबत अशाच प्रकारे एका संस्थेची मागणी आहे. मा.आयुक्तांना वेळ नसल्याकारणाने संचिकेवर मंजूरी घेण्याची राहिलेली आहे. संबधीत अधिकारी यांनी मा.आयुक्तांशी चर्चा करून संबधीत विषय मार्गी लावावा आणि मा.आयुक्त यांचे निर्णयाच्या अधिन राहुन 1000/- रूपये महिना, लाईटबील, मेंन्टनन्स, देखभाल दुरूस्ती या पध्दतीवर उर्वरित कार्यपध्दती करावी अशी विनंती आहे.

**श्री.समीर राजूरकर** :एकत्रितरित्या पॉलिसी मॅटर म्हणून प्रशासनाने ठरवावे सभागृह त्यावर निर्णय घेईल.

**मा.सभापती** :वर्तमानपत्रामध्ये फोटो आलेले आहे. महानगरपालिकेच्या सभागृहाची वाईट अवस्था आहे. मा.स्थायी समितीने यापुर्वी निर्णय घेतलेला आहे की, ज्या संस्थेला सभागृह भाडयाने पाहिजे आहे त्यांना ते देण्यात यावे. लाईटबील, मेंन्टनन्स त्यांनी करावे.

**श्री.नारायण कुचे** :आजूबाजुच्या नागरीकांच्या ना हरकत घेऊन सभागृह भाडयाने देण्यात यावे.

**श्री.समीर राजूरकर** :मा.सर्वसाधारण सभा व स्थायी समितीने या संबधी पॉलिसी तयार केलेली आहे. लाखो रूपये खर्चे करून सभागृह तयार केले आहे ते वापरात न आणल्या गेल्यामुळे दरवाजे, खिडक्या चोरीला जातात. त्या ठिकाणी नको ते उद्योग चालू होतात. त्यामुळे मा.सर्वसाधारण सभा व स्थायी समितीने निर्णय घेण्यात आला होता की, त्या त्या भागातील नागरीसंस्थेने किंवा नागरीकाने मागणी केली. त्यांना देण्यात यावी. आजूबाजुच्या नागरीकांच्या ना हरकत घेऊन तसेच वार्डातील नगरसेवकाची शिफारस घेऊन सभागृह 1000/- रूपये दराने भाडयाने देणेबाबत निर्णय झालेला आहे. ज्या संस्थेला सभागृह भाडयाने पाहिजे आहे त्यांना ते देण्यात यावे. लाईटबील,मेंन्टनन्स त्यांनी करावे. जेणेकरून सभागृह सुस्थितीत राहील.
विषय क्रमांक 743 बाबत मालमत्ता अधिकारी यांनी मा.आयुक्तांची तात्काळ मंजूरी घ्यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार मोहल्ला औरंगपुरा येथील महानगरपालिकेच्या मालकीच्या अधिकारात असलेल्या पिया मार्केट मधील प. म. वरील दुकान क्र. (16) यापूर्वी लिलावाने देण्यात आलेल्या व्यक्तीने ताब्यात घेतले नसल्याने व सदर दुकान रिक्त असल्याने अर्जदार श्री.उमेश छन्नुलाल मेघावाले यांनी विनंती केल्यानुसार सदर दुकान त्यांना र.रू.723/- प्रतिमाह व नेहमीच्या अटी/शर्तीनुसार भाडे तत्वावर देणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. तसेच ज्यांनी मागणी केली असेल, त्यांनाही त्याच दराने देण्यांस मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

याच बरोबर मा.सभापती यांनी राष्ट्रगीताने सभा संपल्याचे घोषित केले.

नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद